cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१०८ | बुधवार दि.०८ जुलै २०२६३ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### आधी प्रयोग, मग अभ्यास जनता आहेच ना 'टेस्ट ड्राइव्ह'साठी?

भारताने गेल्या काही वर्षांत ऊर्जा स्वावलंबनाचे मोठे स्वप्न देशासमोर ठेवले आहे. कच्च्या तेलावरील आयातीचे अवलंबित्व कमी करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि देशांतर्गत इंधन उत्पादनाला चालना देणेया सर्व उद्दिष्टांसाठी २० पेट्रोल म्हणजेच २० टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोल हे सरकारचे महत्त्वाचे धोरण बनले. कागदावर हे धोरण आकर्षक वाटते. परंतु प्रत्येक चांगल्या कल्पनेचे यश तिच्या अंमलबजावणीवर अवलंबून असते. आणि याच ठिकाणी २० धोरण अनेक प्रश्न निर्माण करत आहे.

# खरीपासाठी १६३ लाख टन खतसाठा उपलब्ध

## पुरवठा सुरळीत राहणार : केंद्राचा दावा

दिल्ली । वृत्तसंस्था

**खरीप हंगामात खतांचा तुटवडा भासणार नसल्याचा दावा केंद्र सरकारने केला असून, २ जुलैपर्यंत देशात १६३.३५ लाख टन खतांचा साठा उपलब्ध असल्याची माहिती दिली आहे. एप्रिल ते सप्टेंबर या खरीप कालावधीत देशाची एकूण खतांची गरज ३८३.९० लाख टन असून, त्यापैकी सुमारे ४३ टक्के साठा आधीच उपलब्ध करण्यात आला आहे. जुलै ते सप्टेंबरदरम्यान देशांतर्गत उत्पादन आणि आयात वाढवून पुरवठा सुरळीत ठेवण्यात येईल, असा विश्वास सरकारने व्यक्त केला आहे.**



केंद्रीय रसायन व खतमंत्री जेपी नड्डा यांनी सांगितले की, पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक खत पुरवठा साखळीवर परिणाम झाला, वाहतूक खर्च वाढला आणि जहाजांच्या हालचालींनाही विलंब झाला. मात्र, वेळेवर नियोजन, विविध देशांकडून आयात, देशांतर्गत उत्पादनात वाढ आणि पुरेसा साठा यामुळे शेतकऱ्यांना खतांची कमतरता भासू दिली नाही. सरकारच्या माहितीनुसार, २ जुलैपर्यंत देशात युरियाचा ६९.०८ लाख टन, डीएपीचा १६.६४ लाख टन, एमओपीचा ८.९० लाख टन, संमिश्र खतांचा ४५.६४ लाख टन आणि सिंगल सुपर फॉस्फेटचा २३.०९ लाख टन साठा उपलब्ध आहे. खरीप हंगामात जुलै ते सप्टेंबर या कालावधीत खतांची सर्वाधिक मागणी असते. त्यामुळे या काळातही उत्पादन आणि आयात वाढविण्यावर भर देण्यात आला आहे. देशांतर्गत उत्पादनातही वाढ झाल्याचा दावा सरकारने केला आहे. २०२६–२७ आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत (एप्रिल–जून) युरियाचे उत्पादन ७१.५५ लाख टन झाले असून, ते निर्धारित लक्ष्यापेक्षा ३.६९ लाख टन अधिक आहे. डीएपीचे उत्पादन ९.८४ लाख टन झाले असून, ते उद्दिष्टापेक्षा ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### वाहनचालक परवान्यासाठी अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य

मुंबई: राज्यात वाहनचालक परवाना मिळविण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून नवीन नियमावली लागू करण्यात येणार असून त्यानुसार महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र अनिवार्य करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली. विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य दिलीप लांडे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री सरनाईक बोलत होते. मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, ड्रायव्हिंग परवाना नवीन नियमावलीचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला असून मंजुरीनंतर त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्याचबरोबर राज्यात सुरू असलेल्या अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांवर दंडात्मक कारवाई सुरू आहे. या क्षेत्राचे नियमन करून राज्याला महसूल मिळावा आणि तरुण–तरुणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने शासन नियोजन करत आहे.

### न्यायव्यवस्थेवरील त्या धड्याचे पुनर्लेखन

दिल्ली: सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे बचावात्मक भूमिकेत आलेल्या एनसीईआरटीने मंगळवारी (दि ७ जुलै) इयत्ता ८ वीच्या समाजशास्त्र पाठ्यपुस्तकाचा सुधारित भाग २ जारी केला. यामध्ये न्यायव्यवस्थेवरील वादग्रस्त प्रकरणातील पूर्वीची टीकात्मक मांडणी काढून टाकण्यात आली असून, त्याऐवजी न्याय, घटनात्मक उपाय, न्यायालये, न्यायाधिकरणे (ट्रिब्युनल्स) आणि वाद निवारण यांसारख्या पारंपारिक नागरीशास्त्राच्या घटकांचा समावेश करून या पाठाची पुनर्रचना करण्यात आली आहे. एनसीईआरटीने आठवीच्या पुस्तकातील धड्यात न्यायव्यवस्थेला ''भ्रष्टाचार'' आणि ''प्रचंड प्रलंबित खटल्यांचा'' सामना करावा लागत असल्याचे नमूद केले होते. तसेच न्यायव्यवस्थेकडे ''तक्रारी स्वीकारण्यासाठी एक स्थापित प्रक्रिया'' आहे आणि २०१७ ते २०२१ दरम्यान अशा १,६०० हून अधिक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. ज्या परिच्छेदावर सर्वात तीव्र आक्षेप घेण्यात आला होता.

### अण्वस्त्र सज्ज आयएनएस महेंद्रगिरी शनिवारी ताफ्यात

दिल्ली : भारतीय नौदलाच्या ताकदीमध्ये आणखी एक शक्तिशाली आणि आधुनिक युद्धनौका समाविष्ट होणार आहे. प्रोजेक्ट १७ ए अंतर्गत स्वदेशी बनावटीची सहावी स्टेल्थ फ्रिगेट युद्धनौका आयएनएस महेंद्रगिरी शनिवारी विशाखापट्टणम येथे नौदलात अधिकृतपणे दाखल (कमिशन) केली जाणार आहे. हिंदी महासागर क्षेत्रात चीनच्या वाढत्या हालचाली आणि आव्हानांच्या पार्श्वभूमीवर ही युद्धनौका भारतीय नौदलाची सागरी सुरक्षा अधिक मजबूत करेल. माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडद्वारे निर्मित या ६,६७० टन वजनाच्या मार्गदर्शित क्षेपणास्त्र युद्धनौकेची समुद्री चाचणी झाल्यानंतर, ३० एप्रिल रोजी ती नौदलाकडे सोपवण्यात आली होती. आता ती पूर्व नौदल कमांडच्या अंतर्गत इस्टर्न फ्लीट मध्ये सामील होणार आहे. आयएनएस महेंद्रगिरी ही नौदलाच्या वॉरशिप डिझाईन ब्यूरोने डिझाईन केली असून, ती पूर्वीच्या शिवालिक श्रेणीपेक्षा अधिक प्रगत आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०६ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २५.५० क्विंटल | २,३०० | २,६३० | २,५०३ |
| ज्वारी/हायब्रिड: ५६.०० क्विंटल | २,२०० | ४,४०० | ३,०६० |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | २,२२६ | २,२२६ | २,२२६ |
| तूर : १३.५० क्विंटल | ७,५५१ | ७,५५१ | ७,५५१ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १०१.०० क्विंटल | २,१०० | ३,२०२ | २,५८६ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ६.५० क्विंटल | ५,००० | ५,६७२ | ५,३३६ |

# खनिजांच्या बेकायदेशीर उत्खननास आळा घालण्यासाठी नवीन नियमावली–मंत्री बावनकुळे



मुंबई । प्रतिनिधी

**गौण खनिजांच्या बेकायदेशीर उत्खननाला आळा घालण्यासाठी राज्य सरकार नवीन नियमावली आणणार आहे, तसेच विद्यमान कायद्यांमध्ये सुधारणा करणार आहे. ड्रोन सर्वेक्षणासोबतच इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन तंत्रज्ञानाचा वापर करणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली आहे. आमदार सुनील प्रभू यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला बावनकुळे उत्तर देत होते.**

बावनकुळे म्हणाले, बेकायदेशीर उत्खनन रोखण्यासाठी आणि महसुलाचे नुकसान थांबवण्यासाठी सरकार प्रगत देखरेख प्रणाली, कायदेशीर सुधारणा आणि तंत्रज्ञानावर आधारित पाळत ठेवणे, यांचा समावेश असलेली सर्वसमावेशक रणनीती अवलंबत आहे. गेल्या काही वर्षांत झालेल्या बेकायदेशीर उत्खननाची व्याप्ती निश्चित करण्यासाठी ▶▶ पान २ वर

# शरद पवारांची राष्ट्रवादी महायुतीत?

## जयंत पाटील–विनोद तावडेंची गुपचूप भेट, राज्याच्या राजकारणात खळबळ



मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात ऑपरेशन टायगरच्या माध्यमातून ठाकरेंच्या शिवसेनेतील सहा खासदार एकनाथ शिंदेंच्या शिवसेना पक्षात दाखल झाले आहेत. त्यामुळे, राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप झाल्याचे दिसून आले आहे. ठाकरेंचे आमदारही फुटणार, याची चर्चा सुरू असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि भाजपचे वरिष्ठ नेते विनोद तावडे यांच्यात मुंबईत बैठकत झाल्याची माहिती समोर आली आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष महायुतीत सहभागी झाल्यास पक्षाच्या वाट्याला काय येऊ शकते? याबाबत भाजप नेते विनोद तावडे आणि जयंत पाटील यांच्या बैठकीत चर्चा झाल्याचे समजते. विनोद तावडे आणि जयंत पाटील यांच्यातील चर्चेनंतर जयंत पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्यांमध्येही याबाबत चर्चा झाल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष सत्तेत येत असल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची नेमकी भूमिका काय? असणार याबाबत चर्चा झाल्याची माहिती समोर ▶▶ पान २ वर

# लाडक्या बहिणींना आता २,१०० रुपये मिळणार?

## पीएम मोदींच्या अहवालात मोठी अपडेट



मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील लाखो महिलांच्या दृष्टीने महत्त्वाची ठरलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने या योजनेतील मासिक आर्थिक मदत १,५०० रुपयांवरून २,१०० रुपये करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, ही वाढ नेमकी कधी लागू होणार, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. दरम्यान, पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेने सादर केलेल्या नव्या अभ्यास अहवालात अशा योजनांच्या आर्थिक मदतीत वेळोवेळी वाढ करण्याची शिफारस करण्यात आल्याने २,१०० रुपयांच्या चर्चेला पुन्हा वेग आला आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महाराष्ट्रातील महिलांना आर्थिक आधार देणारी महत्त्वाकांक्षी योजना ठरली आहे. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान महायुती सरकारने ही मदत २,१०० रुपये करण्याचा शब्द दिला होता. त्यामुळे लाखो महिला या निर्णयाच्या प्रतीक्षेत आहेत. अद्याप राज्य सरकारकडून २,१०० रुपयांबाबत कोणतीही अधिकृत अंमलबजावणीची तारीख जाहीर करण्यात आलेली नसली, तरी केंद्र स्तरावर झालेल्या महत्त्वाच्या घडामोडीमुळे हा विषय पुन्हा चर्चेत आला आहे. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेने प्रसिद्ध केलेल्या अभ्यास अहवालात महाराष्ट्रातील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' आणि ओडिशातील 'सुभद्रा योजना' यांचा सविस्तर ▶▶ पान २ वर

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची प्रमुख उपस्थिती जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा उत्साहात



पुणे । प्रतिनिधी

**जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी प्रस्थान सोहळ्याला महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांनी प्रमुख उपस्थिती लावून संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे दर्शन घेतले व भाविक वारकऱ्यांना आषाढी वारीच्या शुभेच्छा दिल्या.**

यावेळी त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या विचारांचे स्मरण करत, ▶▶ पान २ वर

### आळंदीला न जाता वारकरी थेट पुण्यात

आळंदीत झालेल्या अतिवृष्टीमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीने वारकरी, दिंडी प्रमुख आणि भाविकांना आळंदीत अनावश्यक गर्दी टाळण्याच्या केलेल्या आवाहनाला दिंडी प्रमुखांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. राज्यातील विविध भागांतून येणाऱ्या अनेक दिंड्यांनी आपले नियोजन बदलले असून, अनेक वारकरी थेट पुण्यात दाखल झाले आहेत. काही दिंड्यांनी पुण्यात मुक्कामाची व्यवस्था केली आहे. तर, काही दिंड्या आळंदीच्या बाहेरील सुरक्षित ठिकाणी थांबून पालखीच्या प्रस्थानावेळी सहभागी होणार आहेत.

# एमपीएससी आणि सेट परीक्षा २६ जुलैऐवजी ६ सप्टेंबरला




पुणे । प्रतिनिधी

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा आणि आषाढी वारी या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेता २६ जुलै रोजी होणारी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) आता ६ सप्टेंबरला होणार आहे. त्यामुळे, विद्यार्थी बहुप्रतीक्षेत असणारी सेट परीक्षा आणखी लांबली आहे.**

महाराष्ट्रासह गोव्यातील सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असणारी ही सेट सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत घेण्यात येते. विद्यापीठातील सेट परीक्षा विभाग हा राज्य सरकारची नोडल एजन्सी तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील विद्यापीठ आणि वरिष्ठ महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक पदाची पात्रता परीक्षा घेण्याकरिता प्राधिकृत विभाग आहे. त्यानुसार, विद्यापीठाच्या सेट विभागातर्फे महाराष्ट्र आणि गोव्यातील विद्यार्थ्यांसाठी ४१ व्या सेट परीक्षेचे आयोजन २६ जुलै रोजी करण्यात आले ▶▶ पान २ वर

# 'बँक संघटना वकिलांना काळ्या यादीत टाकू शकत नाही'–सर्वोच्च न्यायालय

दिल्ली । वृत्तसंस्था

**बँका आणि इंडियन बँक्स असोसिएशन (आयबीए) केवळ व्यावसायिक निष्काळजीपणाच्या आरोपांवरून वकिलांना काळ्या यादीत टाकू शकत नाहीत, असे एका महत्त्वपूर्ण निकालात सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.**

वकिलांना काळ्या यादीत टाकणे हे बार कौन्सिलच्या वैधानिक शिस्तभंगाच्या अधिकारक्षेत्रावर केलेले अस्वीकार्य अतिक्रमण आहे, असे न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि आलोक आराधे यांच्या खंडपीठाने ३म्हटले आहे. सध्याच्या प्रकरणात, जिथे अपीलकर्त्यावरील आरोप केवळ निष्काळजीपणाशी संबंधित आहे. चर्चा आणि विश्लेषणाच्या आधारे, आमचे



असे मत आहे की, प्रतिवादी बँक आणि आयबीए अपीलकर्त्याचे नाव सावधगिरीच्या यादीत समाविष्ट करू शकत नाहीत. परिणामी, आम्ही त्यांना अपीलकर्त्याचे नाव सावधगिरीच्या यादीतून तात्काळ काढून टाकण्याचे निर्देश देतो. अपीलकर्ता–वकिलावरील व्यावसायिक निष्काळजीपणा किंवा गैरवर्तनाचे कथित आरोप, जरी खरे असले तरी, ते वकील कायद्यांतर्गत अपेक्षित असलेल्या शिस्तपालन प्राधिकरणांच्या विशेष अधिकारक्षेत्रात येतात, असे खंडपीठाने म्हटले. न्यायपालिकेच्या स्वातंत्र्याइतकेच विधी व्यवसायाचे स्वातंत्र्यही महत्त्वाचे आहे. कार्यकारी आणि कायदेमंडळापासून त्यांचे स्वातंत्र्य हे कायद्याचे राज्य आणि लोकशाहीचा पाया आहे. स्व–नियमनाचे तत्त्व हे ऐतिहासिकदृष्ट्या कायदेशीर व्यवसायाच्या स्वातंत्र्याचे निर्णायक वैशिष्ट्ये मानले गेले आहे. जर बँकेच्या मते अपीलकर्ता वकील म्हणून कायदेशीर कर्तव्ये ▶▶ पान २ वर

# एसपी कॉवत यांचे नवे तंत्रज्ञान ठरणार देशाच्या गृह विभागाचे मॉडेल

विशेष प्रतिनिधी । बीड

**अधीक्षक म्हणून बीड जिल्ह्याचा पदभार घेतल्यानंतर जिल्ह्यातील क्राईम कमी झाला. एक प्रकारे पोलिसांची प्रतिमा उजळली गेली, मात्र पोलिसांकडून सर्वसामान्य व्यक्तींना मिळणाऱ्या सुविधा आणि होणारा विलंब लक्षात घेता माहिती तंत्रज्ञान आयआयटी झालेले पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी संपूर्ण पोलीस विभागासाठीच एक नवीन तंत्रज्ञान विकसित केले असून, यामध्ये लेखी फिर्यादीसह स्पाइस फिर्याद यांसह अन्य**



**उपक्रम असलेले डीप फाईव्ह नावाचे सर्व्हर विकसित केले असून याची पहाणी वरिष्ठ पोलीस अधिकारी करणार आहेत. हे नवीन तंत्रज्ञान गृह विभागाने स्वीकारले तर देशभरासाठी एक मॉडेल तयार होईल आणि यामध्ये बीडचे नाव उज्वल होईल हे मात्र निश्चित आहे.**

बीड जिल्हा पोलीस दलात दीप फाईव्ह हा या आधारित उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामुळे जिल्ह्यातील क्राईम कमी होण्यास मोठी मदत होईल आणि गुन्हा दाखल करण्यासाठीचा जास्तीचा लागत असलेला वेळ किमान दहा मिनिटावर येणार आहे. यामुळे वेळ वाचेल आणि जलद चार्जशीट दाखल करण्यासाठी मदत होईल. वेळ वाचून न्याय मिळण्यास मदत होईल. बीड जिल्हा पोलिस दल हे तंत्रज्ञान वापराच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकावर असून, राज्याच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी ▶▶ पान २ वर

**जिल्हा पोलीस अधीक्षक हे आयटी इंजिनिअर असून या क्षेत्रात येण्यापूर्वीही त्यांनी आयटी क्षेत्रात मोठे संशोधन करून स्वत:चा ठसा उमटवला आहे. पोलीस खात्यातही नवनवीन तंत्रज्ञान आणण्यासाठी त्यांनी जिल्ह्यात गेल्या दीड वर्षात मोठे प्रयत्न केले आहेत. पोलीस ठाण्यातील पोलिसांपासून प्रभारी पोलिस अधिकारी, डीवायएसपी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक ते पोलीस अधीक्षक यांच्यापर्यंत अद्यावत लॅपटॉप, संगणक, हायस्पीड इंटरनेट आदी सर्व सुविधा त्यांनी उपलब्ध करून दिल्या आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्याने, बीड जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर असल्याने या उपक्रमासाठी बीड जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे.**

cmyk

अग्रलेख

# आधी प्रयोग, मग अभ्यास जनता आहेच ना 'टेस्ट ड्राइव्ह'साठी?

भारताने गेल्या काही वर्षांत ऊर्जा स्वावलंबनाचे मोठे स्वप्न देशासमोर ठेवले आहे. कच्च्या तेलावरील आयातीचे अवलंबित्व कमी करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि देशांतर्गत इंधन उत्पादनाला चालना देणेया सर्व उद्दिष्टांसाठी २० पेट्रोल म्हणजेच २० टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोल हे सरकारचे महत्त्वाचे धोरण बनले. कागदावर हे धोरण आकर्षक वाटते. परंतु प्रत्येक चांगल्या कल्पनेचे यश तिच्या अंमलबजावणीवर अवलंबून असते. आणि याच ठिकाणी २० धोरण अनेक प्रश्न निर्माण करत आहे.

धोरणाची घोषणा करणे सोपे असते, पण त्यासाठी देशातील नागरिक, वाहन उद्योग, इंधन वितरण व्यवस्था आणि शेती क्षेत्र तयार आहे का, हा मूलभूत प्रश्न विचारला गेला का? भारतात अजूनही लाखो वाहने अशी आहेत जी २० साठी पूर्णपणे सुसंगत नाहीत. अनेक वाहन उत्पादकांनी जुन्या मॉडेल्सबाबत सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे. काही ग्राहकांनी मायलेज कमी होणे, इंजिनच्या कार्यक्षमतेबाबत शंका आणि देखभाल खर्च वाढण्याच्या तक्रारी मांडल्या आहेत. या अनुभवांचा वैज्ञानिक आणि पारदर्शक अभ्यास करून त्याचे निष्कर्ष सार्वजनिक करण्याऐवजी सरकारकडून प्रामुख्याने यशाचीच बाजू मांडली जाते, अशी टीका विरोधक आणि काही तज्ज्ञ करत आहेत.

याच काळात भूतानने भारताच्या २० प्रस्तावाचा स्वीकार केलेला नाही. अर्थात, हा निर्णय भारताच्या धोरणावरील अंतिम शिक्का नाही. भूतानचे वाहन बाजारपेठेचे स्वरूप, ऊर्जा धोरण आणि स्थानिक परिस्थिती भारतापेक्षा वेगळी आहे. तरीही एक प्रश्न उभा राहतोजर एखादा शेजारी देश आपल्या परिस्थितीचा विचार करून थांबू शकतो, तर भारतातील नागरिकांनाही या धोरणाबाबत प्रश्न विचारण्याचा अधिकार नाही का? लोकशाहीत धोरणावर प्रश्न विचारणे म्हणजे विकासाला विरोध नव्हे; तर विकास अधिक जबाबदार करण्याचा प्रयत्न असतो.

सरकारचा दावा आहे की इथेनॉलमुळे तेल आयात कमी होईल आणि शेतकऱ्यांना फायदा होईल. हे उद्दिष्ट नक्कीच स्वागतार्ह आहे. पण त्यासाठी ऊस आणि धान्याचा वाढता वापर, पाण्यावरील ताण, शेतीच्या बदलत्या पद्धती आणि अन्नसुरक्षेवर होणाऱ्या संभाव्य परिणामांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. महाराष्ट्रासारख्या राज्यांमध्ये वारंवार दुष्काळ, भूजल पातळीतील घट आणि पाण्याचे असमान वितरण ही वास्तवातील आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत पाणीखाऊ पिकांवर आधारित इंधन धोरण दीर्घकालीन दृष्टीने टिकाऊ आहे का, हा प्रश्न विचारणे आवश्यक आहे.

याहून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नागरिकांचा विश्वास. कोणतेही राष्ट्रीय धोरण तेव्हाच यशस्वी होते, जेव्हा नागरिकांना त्याची कारणे, फायदे, मर्यादा आणि संभाव्य धोके स्पष्टपणे सांगितले जातात. जर नागरिकांच्या शंका केवळ ''विरोध'' म्हणून बाजूला सारल्या गेल्या, तर विश्वासाऐवजी संशय निर्माण होतो. विज्ञानाचा आधार घेतलेले धोरण लोकांसमोर विज्ञानाच्या भाषेतच मांडले गेले पाहिजे.

ऊर्जा स्वावलंबन ही भारताची गरज आहे. परंतु स्वावलंबनाचा मार्ग नागरिकांच्या सहभागातून आणि पारदर्शकतेतून जावा की फक्त प्रशासकीय आदेशांतून? हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. देशाला हरित ऊर्जा हवीच; पण ती नागरिकांचा विश्वास गमावून मिळणार असेल, तर ते यश अपुरे ठरेल.

२० हे यशस्वी ठरेल की नाही, याचा अंतिम निर्णय इतिहास देईल. मात्र आजचा धडा स्पष्ट आहेकोणतेही मोठे धोरण राबवताना सरकारने केवळ आकडेवारी नव्हे, तर नागरिकांचा अनुभव, तज्ज्ञांचे मत, पर्यावरणीय परिणाम आणि उद्योगांची तयारी यांचाही तितक्याच गांभीर्याने विचार करायला हवा. अन्यथा ऊर्जा स्वावलंबनाचे स्वप्न हे लोकांच्या मनात विश्वासाऐवजी प्रश्न निर्माण करणारे ठरेल.

लोकशाहीत सरकारला धोरण राबवण्याचा अधिकार असतो; पण नागरिकांना त्या धोरणावर प्रश्न विचारण्याचा अधिकार तितकाच मूलभूत असतो. २० च्या चर्चेने हा लोकशाहीचा धडा पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे.

# अवैध दारू वाहतूक करणारी कारसह लाखांचा मुद्देमाल जप्त



**गेवराई । प्रतिनिधी**

**अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत गेवराई पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. शहरात अवैधरित्या विदेशी दारूची वाहतूक करणारी 'फोक्सवॅगन पोलो' कार पोलिसांनी पकडली असून, आरोपीला ताब्यात घेतले आहे. या कारवाईत कारसह एकूण ६ लाख २८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी अवैध धंद्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या पार्श्वभूमीवर, गेवराई पोलीस ठाण्याचे पथक गस्त घालत असताना, आज सायंकाळी ५:४० च्या सुमारास त्यांना संशयास्पद कार आढळून आली. पोलिसांनी वाहनाची झडती घेतली असता, त्यात विविध कंपन्यांच्या विदेशी दारूच्या १३५ बाटल्या आढळून आल्या. या दारूची किंमत २९ हजार ८०० रुपये आहे. पोलिसांनी दारू आणि ती वाहून नेणारी कार असा एकूण ६ लाख २८ हजार ८०० रुपयांचा ऐवज जप्त केला असून, आरोपीवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**अधिकारी आणि पथकाचे कौतुक**

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गेवराई पोलीस ठाण्याचे निरीक्षक किशोर पवार, पोलीस अंमलदार विनोद कुटे, अनिकेत खेडकर आणि राजेंद्र चोरमले यांनी या कारवाईत मोलाची भूमिका बजावली.



# गुरु आनंद महिला प्रतिष्ठान आयोजित दिंद्रुड जि.प.कें.प्रा. शाळेत शालेय साहित्य वाटप

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड आयोजित प्रयास फाउंडेशन मुंबई च्या सहकार्याने विद्यार्थी-विद्यार्थ्यांना वह्या, पाटी, पेन्सिल आदी शालेय साहित्य वाटप करण्यात आले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार बालासाहेब फपाळ होते तर प्रमुख पाहुणे म्हणून देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश काशिद, पत्रकार संतोष स्वामी, पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष नागेश वकरे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमात मुख्याध्यापक मनोहर कटारे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर सिद्धेश्वर बोकन यांनी प्रास्ताविक केले. शालेय व्य. समिती अध्यक्ष नागेश वकरे, पत्रकार संतोष स्वामी, संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे यांनी मनोगत व्यक्त केले. ह भ प हरिदास महाराज सोळंके, सीनियर पत्रकार प्रकाश काशीद, जेष्ठ पत्रकार बंडूजी खांडेकर, पत्रकार बालासाहेब फपाळ या मान्यवरांची खेळीमेळीत समायोचित भाषणे झाली. भाषणामध्ये पत्रकार मान्यवरांनी गुरु आनंद महिला प्रतिष्ठान, प्रयास फाउंडेशन व प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ.सीमा मनोज ओस्तवाल यांच्या सामाजिक कार्याबद्दल अभिनंदन केले. यावेळी सहशिक्षक हरिदास सोळंके, पांडुरंग वाकसे,धनशेट्टी, श्रीमती फपाळ, फुलमाळी, शिंदे यांची उपस्थिती होती.

# अंदाजपत्रकावर सही करण्यासाठी ५ हजारांची लाच घेताना महावितरणचा कार्यकारी अभियंता जाळ्यात

**बीड । प्रतिनिधी**

**एक्का प्लांटसाठी लागणाऱ्या नवीन २५ केव्ही ट्रान्सफॉर्मरच्या अंदाजपत्रकावर सही करण्याच्या मोबदल्यात ५ हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या (महावितरण) कार्यकारी अभियंत्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले आहे. मनिष पुंडलीकराव डाकरे (वय ४७, रा. माऊलीनगर, अंबाजोगाई) असे लाचखोर अभियंत्याचे नाव आहे.**

तक्रारदाराला स्वतःचा एक्क प्लांट सुरू करायचा होता. यासाठी त्यांना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून कर्ज आणि सबसिडी मिळवण्यासाठी नवीन २५ केव्ही ट्रान्सफॉर्मरच्या कामाचा प्रस्ताव तयार करून त्यावर महावितरणचे कार्यकारी अभियंता मनिष डाकरे यांची सही घेणे आवश्यक होते. डाकरे यांनी या कामाच्या अंदाजपत्रकावर सही करण्यासाठी तक्रारदाराकडे ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली. तक्रारदाराला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांच्याकडे तक्रार केली. या तक्रारीवरून एसीबीने ६ जुलै रोजी पडताळणी केली असता, डाकरे यांनी लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर, ७ जुलै २०२६ रोजी एसीबीच्या पथकाने सापळा रचला. या कारवाईदरम्यान डाकरे यांनी तक्रारदाराकडून ५ हजार रुपये स्वीकारताच त्यांना




ताब्यात घेतले. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार-कांगणे आणि अपर पोलीस अधीक्षक शशिकांत शिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक सोपान चिट्टमपल्ले, पोलीस अंमलदार मच्छिंद्र बीडकर, प्रदीप सुरवसे, अमोल खरसाडे आणि चालक अंबादास पुरी यांच्या पथकाने केली. याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, भ्रष्टाचाराशी संबंधित कोणतीही माहिती असल्यास किंवा लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्यांनी तत्काळ एसीबीशी संपर्क साधावा असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक यांनी केले आहे.

# मान्यताविना सुरू असलेल्या किड्स इंग्लिश स्कूलबाबत शिक्षण विभागाचा इशारा; पालकांना प्रवेश न घेण्याचे आवाहन

**परतूर । प्रतिनिधी**

**परतूर येथील किड्स इंग्लिश स्कुल संदर्भात गटशिक्षण अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या अधिकृत पत्रामुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. संबंधित पत्रात या शाळेला शासनाची आवश्यक मान्यता नसल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले असून, पालकांनी आपल्या मुला-मुलींचा प्रवेश या शाळेत घेऊ नये, असे स्पष्ट आवाहन करण्यात आले आहे.**

गटशिक्षण अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या पत्रानुसार, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि पालकांची दिशाभूल होऊ नये, या उद्देशाने हा इशारा देण्यात आला आहे. तसेच, कोणत्याही विद्यार्थ्याचा प्रवेश घेण्यापूर्वी पालकांनी




गटशिक्षण अधिकाऱ्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून शाळेच्या मान्यतेची खात्री करून घ्यावी, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, संबंधित शाळेसमोर ''किड्स इंग्लिश स्कूलमध्ये प्रवेश घेऊ नये'' असा फलक लावण्यात आल्याने परिसरात चर्चेला उधाण आले आहे. या घडामोडीनंतर अनेक पालकांनी शिक्षण विभागाशी संपर्क साधून अधिकृत माहिती घेण्यास सुरुवात केली असल्याचे समजते. शिक्षण विभागाने पालकांना कोणत्याही खासगी अथवा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेण्यापूर्वी त्या शाळेची शासनमान्यता तपासण्याचे आवाहन केले आहे. विशेषतः किड्स इंग्लिश स्कूलबाबत गटशिक्षण अधिकाऱ्यांनी जारी केलेल्या अधिकृत पत्राची दखल घेऊनच पुढील निर्णय घ्यावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. शिक्षण विभागाच्या या कारवाईमुळे मान्यताविना सुरू असलेल्या शाळांविरोधात प्रशासन अधिक कठोर भूमिका घेत असल्याचे संकेत मिळत आहेत.

# किसनराव मोरे यांच्या मध्यस्थीने भगवान जाधव यांचे उपोषण स्थगित

**मंठा । प्रतिनिधी**

**जि प प्रा शाळा शिवनगिरी येथे शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरण्यात यासाठी भगवान दत्तराव जाधव यांनी पाच जुलैपासून शाळेसमोरच उपोषण सुरू केले होते, मात्र शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख तथा माजी पंचायत समिती सदस्य किसनराव मोरे यांच्या मध्यस्थीने अखेर उपोषण मागे घेण्यात आले. गट शिक्षणाधिकारी दत्तात्रेय क्षीरसागर यांनी तात्काळ दोन शिक्षकांना शिवनगिरी येथील शाळेवर तात्पुरती नियुक्ती दिली आहे.**

शिवनगिरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतचे वर्ग



असून अनेक वर्षापासून केवळ पाच शिक्षक कार्यरत आहेत. अपुरे शिक्षकांमुळे शाळेची गुणवत्ता ढासळत असून त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानी वर होत आहे. शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात अनेक वेळा निवेदन देण्यात आले. परंतु शिक्षण विभाग दुर्लक्ष करीत असल्यामुळे भगवान दत्तराव जाधव यांनी आमरण उपोषणाचा निर्णय घेतला. पाच जुलै रोजी त्यांनी उपोषणही सुरू केले. या उपोषणाची माहिती मिळताच शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख तथा माजी पंचायत समिती सदस्य किसनराव मोरे यांनी गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांच्याशी संपर्क साधून शाळेत शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी अशी मागणी केली. त्यांच्या प्रयत्नाला यश आले असून गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने तात्काळ दोन शिक्षकांची नियुक्ती केली आहे. त्यामुळे भगवान दत्तराव जाधव यांनी आपले आमरण उपोषण स्थगित केले आहे. यावेळी किसनराव मोरे यांच्यासह रमेशराव जाधव, पुरुषोत्तम देशमुख, अशोक काकडे, ज्ञानेश्वर जाधव, बाळासाहेब, शरद शिंदे, कैलास जाधव, विष्णू जाधव व केंद्रप्रमुख श्री सस्ते गावातील प्रमुख व शिक्षक उपस्थित होते.

## पान १ वरून...

### खरीपासाठी १६३ लाख टन

१.२३ लाख टनांनी जास्त आहे. याशिवाय संमिश्र खतांचे २०.७७ लाख टन आणि सिंगल सुपर फॉस्फेटचे १३.५० लाख टन उत्पादन झाले आहे. पश्चिम आशियातील तणावामुळे काही काळ नैसर्गिक वायूचा पुरवठा कमी झाल्याने युरिया उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, आता गॅसचा पुरवठा पुन्हा १०० टक्के सुरू झाल्याने देशातील सर्व युरिया प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यरत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. खत मंत्रालयाच्या माहितीनुसार, खत आणि कच्चा माल घेऊन येणाऱ्या २० जहाजांपैकी १५ जहाजांनी होर्मुझ सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार केली असून ती भारतीय बंदरांकडे मार्गस्थ आहेत. या जहाजांमधून ३.३२ लाख टन युरिया, २.५७ लाख टन डीएपी आणि १.११ लाख टन सल्फर भारतात येत आहे. आणखी पाच जहाजांमधून अमोनिया आणि युरियाचा पुरवठा होणार असून, दोन युरिया आणि एका सल्फर जहाजावर माल चढविण्याचे काम सुरू आहे. युरियासाठी ओमान, मलेशिया, व्हिएतनाम, जॉर्जिया, नायजेरिया, रशिया, फिनलंड, इजिप्त, अल्जेरिया, तुर्की आणि नेदरलँड्स या देशांकडून आयातीची व्यवस्था करण्यात आली आहे. तर डीएपी आणि संमिश्र खतांसाठी रशिया, मोरोक्को, इजिप्त, अमेरिका, जॉर्डन, दक्षिण कोरिया, ट्युनिशिया आणि सौदी अरेबिया येथून पुरवठा सुरू असल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

-----------

### शरद पवारांची राष्ट्रवादी

आली आहे. दरम्यान, याबाबत जयंत पाटील यांनी विनोद तावडे यांच्याशी भेट झाल्याचे मान्य केले. मात्र, बैठकीत अनौपचारिक चर्चा पार पडल्याची माहिती त्यांनी दिली. दरम्यान, अशी कुठलीही चर्चा आमच्या पक्षात चालू नाही, ही फक्त चर्चा आहे. सामान्य लोकांचे प्रश्न मांडले जातात त्याला कुठेतरी मुख्यमंत्र्यांनी टिप्पणी केली, अशी फक्त चर्चा आहे, यात काही तथ्य नाही, अशी प्रतिक्रिया यासंदर्भात आमदार रोहित पवार यांनी दिली.

-------------

### खनिजांच्या बेकायदेशीर उत्खननास आळा

राज्यभर ईटीएस सर्वेक्षण करण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. खाणकामाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी रेलटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या तांत्रिक सहकार्याने कोकण विभागीय आयुक्तांच्या कार्यालयांतर्गत एक प्रगत देखरेख वॉर रूम स्थापन केली जाईल. रायगड, पालघर, ठाणे, नवी मुंबई आणि रत्नागिरी यांसारख्या संवेदनशील जिल्ह्यांमध्ये पुढील सहा महिन्यांत ईटीएस आणि ड्रोन सर्वेक्षण सुरू केले जाईल आणि त्यानंतर पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर व इतर खाण-प्रभावित जिल्ह्यांमध्येही याचा विस्तार केला जाईल. गौण खनिजांशी संबंधित नियम आणि कायद्यांमध्ये सुधारणा सुचवण्यासाठी आमदारांची एक समिती स्थापन केली जाईल. समितीच्या शिफारशींच्या आधारे, राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात सरकार सुधारित नियम आणि कायदेशीर सुधारणा सादर करेल. बेकायदेशीर उत्खननाला प्रभावीपणे आळा घालणे, महसुलाची गळती रोखणे आणि पारदर्शक व उत्तरदायी नियामक व्यवस्था निर्माण करणे हे सरकारचे उद्दिष्ट असल्याचे, बावनकुळे यांनी सांगितले.

-----------------

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची

वारी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची, भक्तीची आणि सामाजिक ऐक्याची महान परंपरा असल्याचे सांगितले. तसेच वारकऱ्यांच्या सुविधा, सुरक्षितता आणि आवश्यक सर्व व्यवस्था प्रशासनामार्फत प्रभावीपणे करण्यात आल्याची माहितीही यावेळी घेण्यात आली. या सोहळ्यास विविध मान्यवर, लोकप्रतिनिधी, प्रशासनातील अधिकारी, मंदिर संस्थानचे पदाधिकारी तसेच हजारो वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-------------

### लाडक्या बहिणींना आता २,१००

अभ्यास करण्यात आला आहे. अहवालात म्हटले आहे की, महागाई आणि वाढत्या जीवनावश्यक खर्चाचा विचार करता अशा थेट आर्थिक मदत देणाऱ्या योजनांच्या रकमेचा वेळोवेळी आढावा घेणे आवश्यक आहे. गरज भासल्यास लाभार्थींना दिली जाणारी आर्थिक मदत वाढवण्याचाही विचार सरकारने करावा. विशेष म्हणजे, महाराष्ट्रातील लाभार्थी महिलांच्या बँक खात्यांतील सरासरी शिल्लक ८४ टक्क्यांनी वाढली, तर त्यांच्या मासिक खर्चात ४६ टक्क्यांची वाढ झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. हा खर्च प्रामुख्याने आरोग्य, शिक्षण आणि घरगुती गरजांसाठी करण्यात आला. अहवालात महिलांना केवळ आर्थिक मदत न देता त्यांना डिजिटल साक्षरता, कौशल्य विकास आणि स्वयं-सहाय्यता गटांशी जोडण्याची शिफारसही करण्यात आली आहे, जेणेकरून त्या दीर्घकालीन आर्थिकदृष्ट्या सक्षम बनू शकतील. दरम्यान, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत मोठ्या प्रमाणावर पडताळणी करण्यात आल्यानंतर सुमारे ८० लाख महिला अपात्र ठरल्या आहेत.

--------

### 'बँक संघटना वकिलांना काळ्या यादीत

पार पाडताना व्यावसायिक निष्काळजीपणा किंवा गैरवर्तनाचा दोषी असेल, तर वकील कायद्यांतर्गत आवश्यक कारवाई करण्यासाठी संबंधित सामग्री सक्षम राज्य बार कौन्सिलसमोर ठेवणे हा योग्य उपाय आहे. तथापि, वकिलांनी दिलेल्या कायदेशीर मतांची तत्परता, गुणवत्ता आणि विश्वासार्हता याबाबत बँका आणि वित्तीय संस्थांनी व्यक्त केलेल्या चिंतांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. राज्य बार कौन्सिल आणि बीसीआयची कर्तव्ये केवळ वैयक्तिक तक्रारींवर प्रक्रिया करण्यापलीकडे विस्तारलेली आहेत. वकिलांच्या संस्थेवरील जनतेचा विश्वास टिकवून ठेवण्याचे महत्त्व लक्षात घेता, बीसीआयने स्वतः आणि राज्य बार कौन्सिलद्वारे प्रशासित शिस्तपालन यंत्रणांचे सर्वसमावेशक कार्यप्रदर्शन ऑडिट करणे इष्ट आहे, असे खंडपीठाने म्हटले. आम्ही बीसीआयला एक समिती स्थापन करून व्यावसायिक वर्तनाच्या स्व-नियमनाच्या कर्तव्यांचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करण्याचे निर्देश देतो. आणि शिस्तभंगाची कारवाई करावी, अहवालाचा विचार करावा आणि प्रस्तावित/केलेल्या कारवाईचे प्रतिज्ञापत्र दाखल करावे. या निकालात प्रलंबित खटले कमी करण्यामधील वकिलांच्या कर्तव्याचाही उल्लेख आहे आणि खटल्यांचा वेळेवर निपटारा करण्यासाठी वकिलांमध्ये एकजुटीची आणि सामायिक जबाबदारीची अधिक दृढ आणि नवी भावना जागृत करण्याची अत्यंत गरज असल्याचे म्हटले आहे. आम्हाला आशा आणि विश्वास आहे की, बीसीआय या प्रसंगाला योग्य प्रतिसाद देईल आणि या सर्व मुद्द्यांवर विचार करून न्यायालयाला आपला निर्णय कळवेल, असे न्यायमूर्ती नरसिंह म्हणाले.

-------------

### एमपीएससी आणि सेट परीक्षा

होते. परंतु, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवा भरतीकरिता विविध विषयांच्या परीक्षा २६ जुलै रोजी आयोजित केल्या आहेत. दोन्ही परीक्षा एकाच दिवशी आल्यामुळे विद्यार्थ्यांना कोणत्याही एकाच परीक्षेला उपस्थित राहता येईल. त्यामुळे त्यांचे नुकसान होणार आहे. तसेच ७ ते २५ जुलै या काळात आषाढी वारी आहे. दरम्यान, सेट परीक्षा २६ जुलै रोजी परीक्षा घेतल्यास वाहतुकीची गैरसोय होऊन परीक्षा नियोजन आणि परीक्षार्थी वेळेत परीक्षेस पोहोचण्यात गैरसोय निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर २६ जुलैला होणारी सेट परीक्षा पुढे आयोजित करण्याबाबत विद्यार्थ्यांची निवेदने प्राप्त झाली आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा आणि आषाढी वारी या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेता कोणताही विद्यार्थी सेट परीक्षेपासून वंचित राहू नये, यासाठी २६ जुलैला आयोजित केलेल्या सेट परीक्षेची संभाव्य तारीख सहा सप्टेंबर जाहीर करण्यात येत आहे. काही शैक्षणिक गैरसोय अथवा अडचणी निदर्शनास आल्यास त्या पडताळून त्यानुसार अंतिम तारीख पुढील १५ दिवसांत सविस्तर वेळापत्रकासह जाहीर करण्यात येईल, असे विद्यापीठाच्या सेट विभागाने स्पष्ट केले आहे.

-------------

### एसपी कॉवत यांचे नवे तंत्रज्ञान ठरणार

जिल्ह्यात डी उपक्रम राबविण्यासाठी मान्यता दिली असून, अतिरिक्त पोलीस महासंचालक, वरिष्ठ दर्जाचे अधिकारी दीपक पांडे यांनी बीड जिल्ह्यातील या संदर्भात पाहणी करून उपक्रम सुरू करण्यास मान्यता दिली असल्याची माहिती बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिली. या संदर्भात बोलताना, जिल्हा पोलीस अधीक्षक कॉवत म्हणाले, अद्यावत तंत्रज्ञान कॅमेरा आणि सर्व तंत्रज्ञानाच्या आधारावर दीप आय फाईव्ह हा उपक्रम एआय पद्धतीवर आधारित सुरू करण्यात येणार आहे. यामुळे गुन्हा दाखल करणे वा फायर नोंदवणे, आरोपी शोधणे, पंचनामा करणे, घटनास्थळ पंचनामा करणे ही घटनास्थळी आणि फिर्यादीच्या घरी अथवा घटनास्थळावर करणे सुलभ होणार आहे. या संदर्भात माहिती देताना पोलीस अधीक्षक यांनी सांगितले की, बीड पोलीस डाटा हा स्वतंत्ररित्या जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात असेल यासाठीची अद्ययावत अशी यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे. सदर डाटा सुरक्षित आणि गुगल सारख्या साईटवर जाणार नाही. अथवा कोणासही यातील कसल्याही प्रकारचा डाटा बाहेर देता येणार नाही. बीड पोलीस यंत्रणेची परिभाषा यामुळे बदलेल आणि जिल्ह्यातील गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यास मोठी मदत होईल. त्याचप्रमाणे दोष सिद्धीकरण आणि चार्जशीट दाखल करून तात्काळ न्याय देण्यासाठी दि फाईव या तंत्रज्ञानाच्या उपक्रमामुळे पोलीस दलात अमुलाग्र बदल झाला असून, महाराष्ट्रात सदर उपक्रम राबविण्याचा मान बीडला मिळणार असल्याचे सांगण्यात आले.

-------------

# राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

**शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत सन २०२६ च्या 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारा'साठी अर्ज मागविण्यात आले आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांना या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.**

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत असलेल्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने या पुरस्कारासाठी पात्र शिक्षकांकडून ऑनलाईन स्व-नामांकन मागविण्याचा निर्णय घेतला आहे. ऑनलाईन नोंदणी: पात्र शिक्षकांसाठी स्व-नामांकन प्रक्रिया १५ जून २०२६ पासून सुरू झाली आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत: इच्छुक शिक्षकांना आपली स्व-नामांकने १० जुलै २०२६ पयर्ंत ऑनलाईन पद्धतीने भरता येतील. अंतिम सादरता: अर्जदारांनी आपली स्व-नामांकने अंतिम करून ती १३ जुलै २०२६ पर्यंत पूर्णपणे सादर करणे आवश्यक आहे. इच्छुक शिक्षकांनी अधिकृत वेबपोर्टल https://nationalawardstoteachers. education.gov.in वर नोंदणी करावी, असे आवाहन शिक्षण संचालनालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि. ०८ जुलै २०२६





## राष्ट्रप्रेम त्याग आणि समर्पण यांचे मूर्तीमंत प्रतीक भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ श्यामा प्रसाद मुखर्जी – रत्नपारखी

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी माजलगावच्या वतीने भारतीय जनसंघाचे संस्थापक श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंतीनिमित्त माजलगाव संपर्क कार्यालयात अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी बोलताना भारतीय जनता पार्टीचे शहर मंडळ तालुका अध्यक्ष विनायक रत्नपारखी म्हणाले डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी हे आपल्या वखर राष्ट्रवादी विचारांनी भारत मातेला गौरव मिळून देणारे एक आदर्श,समर्पण भावनेने आयुष्यभर त्याग करणारे व्यक्तिमत्व होते , त्यांचे विचार आजही प्रत्येक कार्यकर्त्याला राष्ट्रसेवा आणि विचारधारेसाठी समर्पित राहण्याची शिकवण देते . कश्मीरला वेगळा दर्जा मिळून भारताची राष्ट्रीय एकात्मता डोक्यात येऊ नये यासाठी आपले आयुष्य संपर्पित केले, एक देश में दो प्रधान दो विंधान दो निशाण नही चलेंगे असा ठाम विचार करत त्यांनी आपली भूमिका कायम ठेवली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कल्याण शेप यांनी केले तर प्रस्ताविक डॉ अभिजीत सोळंके यांनी केले तर आभार प्रदर्शन भाजप युवा नेते अभय होके पाटील यांनी केले., या अभिवादनाच्या कार्यक्रमास उपस्थित माजी नगराध्यक्ष डॉक्टर अशोकराव तिडके, माजलगाव पात्रुड मंडळाचे तालुकाध्यक्ष डॉ अभिजीत सोळंके , भाजपा युवा नेते अभय भैय्या होके पाटील,कल्याणराव शेप,आनंद कुलकर्णी, नानासाहेब घोडके, पवन मोगरेकर, विनोद लड्डा,दत्ता महाजन,सतीशराव जोशी,बाळासाहेब साळवे,भरत जोशी,रवी वाकळे यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अकरावी प्रवेश फेरीला ८ जुलै पर्यंत मुदत वाढ

बीड । प्रतिनिधी

राज्यातील जोरदार अतिवृष्टीमुळे अकरावीच्या केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला पुन्हा मुदतवाढ देण्यात आली आहे. मुंबई,ठाणे,पालघर, रायगड,पुणे आणि कोकणासह विविध जिल्ह्यात जाहीर झालेल्या सुट्यांमुळे विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये म्हणून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने विशेष फेरी –१ साठी ८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत मुदत वाढवली असून, सुधारित वेळापत्रक सोमवारी जाहीर केले. यंदा राज्यातील ९ हजार ६८८ महाविद्यालयांमध्ये अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. आतापर्यंत नोंदणी केलेल्या १४ लाख ७३ हजार ४२० विद्यार्थ्यांपैकी १० लाख ८ हजार ९४ विद्यार्थ्यांनी आपला प्रवेश निश्चित केला आहे. या पहिल्या विशेष फेरीत कॉलेज मिळालेल्या विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालयात जाऊन कागदपत्रांची पडताळणी करावी लागेल आणि शुल्क भरून प्रवेश निश्चित करावा लागेल. महाविद्यालयांनाही विद्यार्थ्यांशी संपर्क साधून ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रवेशाची पुष्टी, नकार किंवा रद्दीकरण महाविद्यालयांच्या लॉगिनद्वारे होईल. या मुदतीनंतर ९ जुलै रोजी डेटा प्रक्रिया केली जाईल,तर १० जुलै रोजी सकाळी १० वाजता रिक्त जागांची यादी प्रसिद्धी करून पुढील फेरीचे वेळापत्रक जाहीर केले जाईल. इच्छुक विद्यार्थ्यांनी अकरावी विशेष प्रवेश फेरीची अंतिम मुदत ८ जुलै असून याची दखल घेण्याचे आवाहन शिक्षण व करिअर कौन्सिलर डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे.

# बीडमध्ये गुन्हेगारांचे धाबे दणाणले दोन टोळ्यांतील चार गुन्हेगार हद्दपार


बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी कठोर पावले उचलली असून, जिल्ह्यात दहशत निर्माण करणाऱ्या दोन टोळ्यांतील चार गुन्हेगारांना चार जिल्ह्यांतून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्याचे आदेश दिले आहेत. या कारवाईमुळे गुन्हेगारी विश्वात खळबळ उडाली आहे.









पोलीस अधीक्षक पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून श्री. काँवत यांनी चोरी, घरफोडी, खून, दरोडा आणि गुटखा माफियांसारख्या गंभीर गुन्हेगारी प्रवृत्तींविरुद्ध 'करडी नजर' ठेवली आहे. याच अनुषंगाने पेठ बीड आणि बर्दापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन टोळ्यांवर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ अन्वये कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

पेठ बीड टोळी: शेख जावेद शेख बशीर (वय ४४) आणि शेख इकबाल शेख रशीद (वय २८) या दोघांवर शरीर आणि जिवनावश्यक वस्तू कायद्याशी संबंधित गंभीर ६ गुन्हे दाखल आहेत. त्यांना बीड, जालना, धाराशिव आणि परभणी या ४

बर्दापूर टोळी: अभय रवींद्र जोगदंड (वय २१) आणि अर्जुन धनराज नागटिळक (वय २१) यांच्यावर शरीर आणि मालाविरुद्धचे ४ गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्यांना बीड, परभणी आणि लातूर जिल्ह्यांतून हद्दपार केले आहे.

पोलीस दलाची धडक कामगिरी

उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडून चौकशी पूर्ण झाल्यानंतर, गुन्हेगारांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देऊन पोलीस अधीक्षकांनी ७ जुलै २०२६ रोजी हे आदेश पारीत केले. ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती चेतना तिडके, श्री. शेख समीर, श्री. ऋषीकेष शिंदे, श्री. वेंकटराम आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या व संबंधित पोलीस ठाण्याच्या पथकाने केली आहे.

**गुंडांवर कारवाई सुरूच राहणार**

भविष्यातही जिल्ह्यात टोळीने गुन्हे करणाऱ्यांविरुद्ध 'एमपीडीए' 'मोक्का' आणि हद्दपारीसारख्या कठोर प्रतिबंधक कारवाया सुरूच राहतील, असा इशारा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिला आहे.

## 'टाटा मेमोरियल' चा 'गुरुकृपा ' समूहासोबत कर्करोग संशोधन सामंजस्य करार

### ओमप्रकाश शेटे, डॉ.अशोक थोरात यांच्या उपस्थितीत झाल्या स्वाक्षऱ्या

माजलगाव । प्रतिनिधी

कर्करोग उपचार आणि संशोधनाच्या क्षेत्रात माजलगावमध्ये एक मोठे पर्व सुरु झाले असून टाटा मेमोरियल या कर्करोग क्षेत्रातील मोठ्या समूहाने माजलगावच्या 'गुरुकृपा ' शिक्षण समूहासोबत कर्करोग संशोधन, उपचार आणि जागृतीच्या संदर्भाने सामंजस्य करत केला आहे. दोन दिवसापूर्वी 'गुरुकृपा ' मध्ये झालेल्या कार्यशशाळेनंतर आयुष्मान भारतचे ओमप्रकाश शेटे, कामगार विमा रुग्णालयाचे संचालक डॉ अशोक थोरात यांच्या उपस्थितीत टाटा मेमोरील आणि गुरुकृपाच्या पदाधिकाऱ्यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या.



टाटा मेमोरियल च्या वतिने नुकतेच एका कार्यशाळेचे आयोजन येथील 'गुरुकृपा ' शिक्षण समूहात करण्यात आले होते.या कार्यशाळेनंतर टाटा मेमोरियल आणि गुरुकृपा समूहामध्ये कर्करोग उपचार, संशोधन आणि जागृती या संदर्भाने सामंजस्य करार करण्यात आला. आता या करारानंतर कर्करोगाच्या क्षेत्रात बीड जिल्ह्यात आणि परिसरात टाटा मेमोरियल आणि गुरुकृपा समूह एकत्रित काम करणार आहेत. टाटा मेमोरिअल चे संचालक राजीव दीक्षित आणि गुरुकृपा समूहाचे डॉ यशवंत राजेभोसले यांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी आयुष्मान भारतचे ओमप्रकाश शेटे यांच्यासह कामगार विमा रुग्णालयाचे संचालक डॉ. अशोक थोरात तसेच डॉ.पाणसे यांची उपस्थिती होती.

**रुग्ण,विद्यार्थी आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांना होणार फायदा**

या करारामुळे मराठवाड्यातील बीडसह बहुतांश जिल्ह्यातील रुग्णांना आता माजलगावसारख्या ठिकाणी कर्करोगावरील अद्ययावत उपचाराच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. तसेच कर्करोगाच्या क्षेत्रातील अद्ययावत शिक्षण आणि संशोधनात सहभागी होण्याची संधी 'गुरुकृपा' च्या विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. प्रिंसरातील वैद्यकीय अधिकारी आणि वैद्यकीय व्यवसायिकांना देखील प्रशिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. बीड जिल्ह्याच्या दृष्टीने हा अभिमानास्पद क्षण असल्याचे यावेळी ओमप्रकाश शेटे यांनी सांगितले.

## पान ६ वरुन...

### गावच्या सरपंचांनी वृक्षारोपणासाठी

त्यांनी यावेळी स्पष्ट केले. शासकीय यंत्रणांना रोपे विनामुल्य पुरविली जाणार आहेत. यासाठी जिल्ह्यात सध्या आष्टी येथील रोपवाटिकेत पुरेशा प्रमाणात रोपे उपलब्ध आहेत. ग्लोबल विकास ट्रस्टसोबत सामंजस्य करार केला जात असून प्रशासनाकडून गरजेनुसार आणि उपलब्धतेनुसार त्यांना परळी व अंबाजोगाई परिसरात वृक्षारोपणासाठी रोपे पुरवली जाणार आहेत. ग्रामीण भागातील शाळांमध्ये वृक्ष लागवड करताना घाईगडबड न करता, तेथील जागेची उपलब्धता पाहूनच शाळांची निवड करावी, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

### जुगार अड्ड्यावर छापा

तिथे तिर्रट नावाचा जुगार खेळला जात असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी ६ इसमांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून रोख रक्कम आणि मोटारसायकल असा एकूण ४,२५,०००/– रुपयांचा मुद्देमाल जप्त केलाया प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद क्रमांक ४११/२०२६, कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोह/२०२६ राठोड हे करत आहेत। ही कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख आणि गेवराईचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली। कारवाईत गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पवार, पोउपनि अप्पासाहेब रोकडे, सुंदर राठोड, रविंद्र राऊत, धनंजय सुळ आणि रामराजे यांनी सहभाग घेतला होता.

### मुक्ताबाईंचा पालखी सोहळा

गीताभाभी पवार यांच्या हस्ते होणार असून, यावेळी मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, उपाध्यक्ष ड. जिजा घुंबार्डे, नपचे गटनेते राजेंद्र राक्षसभुवनकर, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, सर्व सभापती, नगरसेवक , नपच्या सर्व कर्मचाऱ्यांची उपस्थिती राहणार आहे. पालखी सोहळा गेवराई येथील चिंतेश्वर मंदिरात मुक्कामाला थांबणार असून, शहरातील भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन नगराध्यक्षा सौ. पवार यांनी केले आहे.

### गायक राज रायते यांना

वयाच्या २० व्या वर्षात इतक्या कमी वयात राज रायते यांनी एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी, ओळख, पुरस्कार मिळवले आहेत तसेच कॉलेजमध्ये ही राज अनेक वेळा राज्य पातळीवर गायन करून आलेला आहे. याचा सार्थ अभिमान सर्वांना आहे. राज ने आपल्या कार्याने तेली समाजाची आणि रायते परिवाराची अनखिन मान उंचावीली आहे. राज रायते यांनी एका मुलाखतीत सांगितले की माझ्या यशामागे संताजी महाराजांची कृपा,सर्व समाज बांधवांचा आशीर्वाद , आई–वडिलांच मोलाच सहकार्य व आशीर्वाद , तसेच माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर साहेब यांची खंबीर साथ आहे. राज रायते यांना प्रथम तेली युवा गायक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल राज यांचे सर्वत्र शुभेच्छा व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### जिल्हाधिकारी अशीमा

सुमारे ३,००० शेतकऱ्यांना याचा थेट लाभ होणार आहे.

यावेळी च्या माध्यमातून सुरू असलेल्या १०८ किमी नदी पुनरुज्जीवन अभियान तसेच सिरसाळा येथील दोन तलावांच्या पुनरुज्जीवनाच्या कामाची पाहणी करून त्यांनी या लोकहितकारी उपक्रमांचे कौतुक केले. ही भेट केवळ औपचारिक नव्हती, तर शाश्वत शेती, जलसंधारण आणि ग्रामीण विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात ठरणारी प्रेरणादायी पाऊल होती.

### त्या मयत तरुण शेतकऱ्याच्या

प्रशासनाने कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही.तरी या कुटुंबातील करता धरता मुलगा काळाच्या पडद्याआड केला आहे.तरी या कुटुंबाला शासनाने वीस लाखाची मदत म्हणून तात्काळ जाहीर करावी व घडलेल्या घटनेचा वरिष्ठान मार्फत सखोल चौकशी करून महावितरणाच्या अधिकारी व कर्मचाऱ्या विरोधात तात्काळ गुन्हा दाखल करावा. व यामुळे त्याला न्याय द्यावा. अन्यथा ठाकरे सेनेच्या वतीने तालुका शिवसेना, युवासेना व महिला आघाडीच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा यावेळी ठाकरे सेनेचे वडवणी युवा शहराध्यक्ष भैय्या खोसे यांनी दिला आहे. यावेळी युवा तालुका अध्यक्ष संजय धपाटे, युवा नेते नवनाथ मोरे, राहुल शेंडगे, विजय वाघमारे, यांच्यासह आदीजन उपस्थित होते.

### काँग्रेस कमिटी अंबाजोगाई

सरचिटणीस आदित्य दादा पाटील, बीड जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.

निवड झाल्यानंतर बोलताना नव्याने नियुक्त झालेले तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे म्हणाले, महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी मंत्री अशोकराव पाटील, खासदार रजनीताई पाटील, जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे, युवा नेते आदित्य दादा पाटील यांनी सर्वसामान्य घरातील मला पुन्हा एकदा अंबाजोगाई काँग्रेस कमिटीच्या तालुका अध्यक्षपदाची जबाबदारी दिली त्याबद्दल त्यांचे आभार. याचा सर्व श्रेय महिला, युवक, एनएसयुआय, अल्पसंख्यांक, ओबीसी व सर्वच विभागाच्या सहकाऱ्यांना जातं. आगामी काळात ही जबाबदारी पूर्णतः सक्षमरीत्या पार पाडणार असून अंबाजोगाई तालुक्यात विरोधी पक्षाची भूमिका काय असते हे दाखवून देऊ. पक्ष संघटन मजबुतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करून काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवत अंबाजोगाई तालुक्यात घराघरात काँग्रेस पोहोचवणार.

संघटन सृजन अभियानातून मिळालेल्या कार्यकर्त्यांच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी लोमटे यांनी बूथ कमिटी मजबूत करणे, युवकांना पक्षात आणणे आणि शेतकरी, पाणी, रस्ते यांसारख्या स्थानिक प्रश्नांवर आक्रमक भूमिका मांडण्याचा निर्धार व्यक्त केला आहेनिवड जाहीर होताच महिला आघाडी, युवक काँग्रेस, एनएसयुआय, ओबीसी सेल आणि अल्पसंख्यांक सेलच्या पदाधिकारी तसेच सर्व स्तरातून अभिजीत लोमटे यांचे अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## शेतकऱ्यांना कर्जमाफी, पिकविम्यात फसवले –राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

अतिवृष्टी झाल्यानंतर शेतकऱ्यांना पिक विमा मध्ये हेक्टरी १७ हजार रुपये देऊ अशी घोषणा केली असताना बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दमडीचा फायदाही सरकारने दिलेला नाही, तसेच निवडणुकीमध्ये शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू म्हणून आश्वासन दिले असताना सरकारने कर्जमाफी मध्ये सातबारा कोरा केलेला नाही सरकारने शेतकऱ्याला पिक विमा व कर्जमाफीत फसवलेले आहे, असे प्रतिपादन शेतकरी हक्क मोर्चाचे राजेंद्र आमटे यांनी केले.

शेतकरी हक्क मोर्चा येत्या काही दिवसातच सरकारच्या विरोधामध्ये सरसकट शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात यावी व बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हेक्टरी १७ हजार रुपये अनुदान देऊ असे आश्वासन दिलेले असताना शेतकऱ्याला फसवणाऱ्या सरकारच्या विरोधात शेतकरी हक्क मोर्चा लवकरच तीव्र आंदोलन करेल. यात शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने भाट सांगवी या गावांमध्ये शेतकरी जागृती अभियान व पुढील आंदोलनाची दिशा ठरवताना शेतकऱ्यांशी चर्चा करताना शेतकरी हक्क मोर्चाच्या राजेंद्र आमटे यांनी व्यक्त केले.



भाटसांगवी येथे आंदोलनासाठी शेतकरी बैठक

भाटसांगवी येथे शेतकरी बैठकीमध्ये शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे कमलेश बोराडे, अंकुश बोरवडे, बिलास बोरवडे, गोवर्धन मस्के, दिगंबर चादर, सुभाष बोरुडे, राजाभाऊ सोनवणे, उद्धव बोरवडे, महेश सोनवणे, संदिपान सोनवणे, बाळू बोरवडे, समाधान मस्के, नारायण सोनवणे, मधुकर सोनवणे, नारायण बोरवडे ,बन्सी बोरुडे ,रवी सोनवणे, आदि शेतकरी उपस्थित होते.

## चिंचोटी तरूण शेतकऱ्याचा दुर्देवी मृत्यू; कुटुंबाला शिवसेनेचा मदतीचा हात



वडवणी । प्रतिनिधी

वीज महावितरण कंपनीच्या गलथान कारभाराचा नाहक बळी गेलेल्या चिंचोटी येथील तरूण शेतकरी माऊली दिलीप गोंडे यांच्या कुटुंबाबियांच्या सांत्वन करण्यासाठी शिवसेनेचे जिल्हासंपर्कप्रमुख सह शिवसेनेचे पदाधिऱ्यांनी सोमवार दि ६ रोजी कुटुंबियांचे सांत्वन केले.

शिवसेना सदैव आपल्या पाठिशी असल्याचा शब्द देत करत आधार दिला व आर्थिक मदतही केली. तालुक्यातील चिंचोटी येथील तरूण शेतकरी माऊली गोंडे शेतात गेले असता त्यांचा लोंबकळणाऱ्या ताराला स्पर्श झाल्याने या तरूणाचा जागीच मृत्यू झाला. या दुर्देवी घटनेने संपूर्ण तालुका हळहळ व्यक्त करत आहे. घरातील करता सवर्ता व्यक्ती गेल्याने कुटुंब अक्षरशा उघड्यावर पडल्याने त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या कुटुंबीयांची संतुलन करत भेट दिली यावेळी संपर्कप्रमुख परशुराम जाधव,नितिन धांडे, तालुकाप्रमुख विनायक मुळे, यांच्यासह शिवसेनेची संपूर्ण टिम माऊली गोंडे यांच्या सांत्वनासाठी चिंचोटी येथे गेली. गोंडे कुटुंबाला धीर देण्याचे काम शिवसेनेने केले. त्यांना आर्थिक मदत करत धीरही दिला. शिवसेना आपल्या परिवाराच्या पाठिशी सदैव खंबीर उभी राहिल असा शब्द शिवसेनेने दिला.संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव,नितिन भैय्या धांडे, शिवसेना वडवणी तालुका प्रमुख मा विनायक बप्पा मुळे, विठ्ठल दादा लगड, बंडु मामा जाधव, अंबादास जाधव,सरपंच संजय धपाटे, नवनाथ मोरे, रतन सवासे, अशोक नाना गोंडे, महेश जाधव, सह उपस्थित होते.

## आष्टी मतदार संघाच्या शिरपेचात मानाचा तुरा!

नवी दिल्ली । प्रतिनिधी

शैक्षणिक, सामाजिक, राजकीय,कृषी आणि जनसेवा क्षेत्रात सातत्याने घेतलेल्या अथक परिश्रमांची आणि उल्लेखनीय कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. नवी दिल्ली येथील प्रतिष्ठित 'हयात रेजेन्सी' हॉटेलमध्ये आयोजित एका अत्यंत भव्य आणि दिमाखदार सोहळ्यात, नवभारत मीडिया ग्रुपचा अत्यंत प्रतिष्ठेचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन माजी आ. भीमराव धोंडे यांना सन्मानित करण्यात आले.हा बहुमान दिल्ली विधानसभेचे अध्यक्ष विजेंदर गुप्ता आणि भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते तथा खासदार डॉ. सुधांशू त्रिवेदी यांच्या शुभहस्ते स्वीकारण्याचे भाग्य मला लाभले.

या सुवर्णक्षणी भीमराव धोंडे यांच्या पत्नी सौ.दमयंती धोंडे आणि चिरंजीव अभय धोंडे यांची कौटुंबिक उपस्थिती होती.याच सोहळ्याचे औचित्य साधून नवभारत मीडिया ग्रुपच्या विशेष 'कॉफी टेबल बुक' चे अनावरण करण्यात आले.या कार्यक्रमाला देशातील अनेक प्रतिथयश नेते आणि मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.यामध्ये





### नवी दिल्लीत माजी आ.भीमराव धोंडेचा महाराष्ट्र गौरव पुरस्काराने गौरव; लोककल्याणकारी कार्याचा राष्ट्रीय स्तरावर सन्मान

ना.नितीन गडकरी (केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री), ना. ज्योतिरादित्य सिंधिया (भारत सरकारचे संचार मंत्री),श्रीमती अनुप्रिया पटेल (केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री), ना. प्रतापराव जाधव (केंद्रीय आयुष राज्यमंत्री – स्वतंत्र प्रभार),भूमी पेडणेकर (प्रसिद्ध सिनेअभिनेत्री) संजय तिवारी (संपादक,नवभारत मीडिया ग्रुप) या सर्व दिग्गजांच्या उपस्थितीने या सोहळ्याची शोभा अधिकच वाढली.

हा सन्मान आष्टी मतदार संघातील जनतेचा आणि कार्यकर्त्यांचा!

हा पुरस्कार म्हणजे केवळ माझा वैयक्तिक सन्मान नाही, तर आष्टी विधानसभा मतदार संघातील तमाम जनतेने माझ्यावर दाखविलेल्या अथांग विश्वासाचा, माझ्या असंख्य कार्यकर्त्यांच्या अहोरात्र घेतलेल्या अथक परिश्रमांचा आणि लोकहितासाठी आम्ही सर्वांनी सातत्याने केलेल्या संघर्षाचा हा गौरव आहे.भविष्यासाठी अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार जनतेच्या सुख–दुःखात सदैव सावलीसारखे उभे राहून विकास, शिक्षण, शेती, रोजगार आणि सर्वसामान्यांच्या न्याय्य हक्कांसाठी प्रामाणिकपणे काम करण्याची माझी प्रेरणा या राष्ट्रीय सन्मानामुळे अधिक बळकट झाली आहे.या पुरस्काराने माझी समाजाप्रती असणारी जबाबदारी आणखी वाढवली असून, भविष्यातही जनतेच्या विश्वासाला तसूभरही तडा जाऊ न देता, लोककल्याण आणि आष्टी मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक जोमाने आणि ताकदीने कार्यरत राहण्याचा माझा निर्धार कायम आहे... आणि सदैव राहील!

–भीमराव धोंडे (आष्टी विधानसभा मतदारसंघ)



## प्रभाकर आंधळे मातृभूमी प्रतिष्ठानकडून सन्मानित

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हिंगणी ( खुर्द) तालुका जिल्हा बीडचे आदर्श मुख्याध्यापक प्रभाकर आंधळे दिनांक ३० जून२०२६ रोजी सेवानिवृत्त झाल्याबद्दल हिंगणी बीडकर ग्रुप व मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने त्यांचा सपत्नीक प्राचार्य डी.जी. तांदळे यांच्या हस्ते शाल,पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन दिनांक ६ जुलै २०२६ सोमवार रोजी त्यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला.यावेळी प्राचार्य डी.जी. तांदळे, डॉ. संजय तांदळे, हिरामण तांदळे , रवींद्र मुंडे, बाजीराव ढाकणे, राहुल मुंडे, अशोक आंधळे, रामेश्वर आंधळे, कपिल मुंडे,भगवान मुंडे,कैलास पुरी आदींची उपस्थिती होती.

# राज्यात ३९ टक्के पेरण्या पूर्ण

## मॉन्सूनचे आगमन लांबल्याने खरीप पेरण्यांवर परिणाम

पुणे / प्रतिनिधी

राज्यात सर्वदूर पाऊस सुरू झाल्यामुळे रखडलेल्या खरीप पेरण्यांना वेग मिळण्याची चिन्हे आहेत. ६ जुलैपर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्यात सरासरीच्या केवळ ३९ टक्के क्षेत्रावर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. मात्र, गेल्या चार-पाच दिवसांत अनेक भागांत पेरणीयोग्य पाऊस झाल्याने वाफसा येताच पेरण्यांना गती मिळणार आहे. सध्याची परिस्थिती पाहता जुलैअखेर राज्यात सरासरीइतक्या क्षेत्रावर पेरणी पूर्ण होईल, असा अंदाज कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

राज्यात गेल्या पाच वर्षांतील खरीप हंगामाचा विचार करता सरासरी १४४ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी होते. गेल्या वर्षी एकूण खरीप पेरा १४३ लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर झाला होता. यंदा ६ जुलैपर्यंतच्या आकडेवारीनुसार ६०.६९ लाख हेक्टर, म्हणजेच सुमारे ३९ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत ७२ टक्क्यांहून अधिक क्षेत्रावर पेरण्या झाल्या होत्या. मात्र, पुढील पंधरवड्यात सरासरीच्या १०० टक्के पेरण्या पूर्ण होतील, अशी अपेक्षा कृषी विभागाने व्यक्त केली आहे. यंदा एल-निनोच्या प्रभावामुळे मॉन्सूनचे आगमन लांबल्याने खरीप पेरण्यांवर परिणाम झाला होता. मात्र, गेल्या चार-पाच दिवसांत




परिस्थितीत लक्षणीय बदल झाला असून, राज्यभर मॉन्सून सक्रिय झाला आहे. त्यामुळे पेरणीस पोषक वातावरण निर्माण झाले आहे. कृषी आयुक्तालयातील सूत्रांनी सांगितले, की खरीप पेरण्यांना वेग येत असल्याने राज्यातील क्षेत्रीय कृषी अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांना क्षेत्रीय यंत्रणेमार्फत तसेच 'महाविस्तार' ॲपच्या माध्यमातून तांत्रिक मार्गदर्शन करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. राज्यातील प्रमुख भात उत्पादक प्रदेश असलेल्या कोकणात गेल्या महिनाभरात सरासरीच्या १२० टक्के पाऊस झाला आहे. त्यामुळे भात रोपवाटिका निर्मितीची चिंता दूर झाली असून, तयार रोपांच्या पुनर्लागवडीसाठी चिखलणी व लावणीस अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी, भात लागवडीपुढील सुरुवातीच्या टप्प्यातील अडचणी मोठ्या प्रमाणात दूर झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

राज्यात खरीप मक्याचे सरासरी क्षेत्र सुमारे सव्वा नऊ लाख हेक्टर आहे. ६ जुलैपर्यंतच्या आकडेवारीनुसार त्यापैकी सुमारे ५.३४ लाख हेक्टर (५७ टक्के) क्षेत्रावर मका पेरला गेला आहे. सुमारे पावणेतेरा लाख हेक्टर तूर क्षेत्रापैकी ५.५९ लाख हेक्टरहून अधिक (४४ टक्के) क्षेत्रावर तूर पेरणी पूर्ण झाली आहे. तर ४८ लाख हेक्टर सरासरी क्षेत्र असलेल्या सोयाबीनपैकी आतापर्यंत २०.९५ लाख हेक्टर (४४ टक्के) क्षेत्रावर पेरणी झाली आहे. कपाशीचे सरासरी क्षेत्र ४२.४७ लाख हेक्टर असून आत्तापर्यंत सुमारे २४ लाख हेक्टर (४७ टक्के) क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे.

### काही तालुक्यांमध्ये पेरणी करण्यात अडचणी

राज्यात बहुतांश भागांत समाधानकारक पाऊस झाला असला, तरी सुरगाणा, पेठ, इगतपुरी, नंदुरबार, नवापूर, शहादा, तळोदा, अक्राणी आणि राहुरी या तालुक्यांमध्ये अद्यापही सरासरीच्या २५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे. मात्र, राहुरी वगळता इतर सर्व तालुक्यांत लवकरच चांगल्या पावसाची शक्यता असल्याने खरीप पेरणीवर त्याचा विपरीत परिणाम होणार नाही, असा विश्वास कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# सामान्य बटाट्याऐवजी गुलाबी बटाट्याची लागवड करा, होईल चांगला फायदा



शेतकऱ्यांना सामान्य बटाट्याची लागवड करण्याची गरज नाही. कारण आता गुलाबी बटाट्याचीही लागवड होऊ लागली आहे. हा बटाटा दिसायला खूप छान लागतो आणि त्याची चवही सामान्य बटाट्यापेक्षा चांगली असते.

हा बटाटा अधिक पौष्टिक असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यात कार्बोहायड्रेट आणि स्टार्च चांगल्या प्रमाणात असते. गुलाबी बटाटे हे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असल्याचे सांगितले जाते. त्याच वेळी ते लवकर कुजत नाही. हा बटाटा बाजारात मोठ्या प्रमाणात लोकप्रिय होत आहे. मागणी वाढल्याने शेतकऱ्यांना नफा मिळू लागला आहे. त्याची मागणी जितकी वाढेल तितका शेतकऱ्यांना फायदा होईल. तराई आणि डोंगराळ अशा दोन्ही ठिकाणी या बटाट्याची लागवड करता येते. पीक तयार होण्यासाठी ८० ते १०० दिवस लागतात. हा बटाटाही खूप चमकदार असल्यामुळे लोक त्याकडे आकर्षित होतात. किंमतीबद्दल बोला, बाजारात त्याची किंमत सामान्य बटाट्यांपेक्षा जास्त आहे. ते प्रति हेक्टर ४०० क्विंटलपेक्षा जास्त उत्पादन करू शकते. गुलाबी बटाट्याच्या एका पिकातून शेतकऱ्याला एक ते दोन लाख रुपयांचा नफा मिळतो. सामान्य बटाट्याच्या तुलनेत हा बटाटा रोगप्रतिकारशक्ती वाढवण्याचे काम करतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. गुलाबी बटाटे अनेक महिने सहज साठवता येतात. त्यामुळे विषाणूंमुळे विकसित होणारे आजारही होत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च कमी होऊन नफाही वाढतो. यामुळे हे पीक शेतकऱ्यांसाठी फायदेशीर आहे. तसेच शेतकऱ्यांना हा एक चांगला पर्याय देखील आहे. यामुळे शेतकऱ्यांना चार पैसे मिळणार आहेत.

# गायींना हिरव्या चाऱ्यासोबतच, सुखा चाराही द्या; नाहीतर होईल हे नुकसान!

राज्यात प्रामुख्याने शेतकरी दुग्ध व्यवसाय करण्यावर अधिक भर देत आहे. मात्र, दुग्ध व्यवसायातील बारकावे लक्षात न घेतल्यामुळे शेतकऱ्यांना दूध उत्पादनातील घटीला सामोरे जावे लागते. सध्या उन्हाळ्याचा काळ सुरु असून, काही शेतकऱ्यांकडे पाणी उपलब्ध असल्यास ते मोठ्या प्रमाणात हिरवा चारा दुधाळ गायींसाठी उत्पादित करत असतात. मात्र, दररोज दुधाळ जनावरांना नियमित केवळ हिरवा चारा द्यावा का? किंवा मग अन्य कोणत्या पद्धतीने चाऱ्याचे नियोजन करणे गरजेचे याबाबत माहिती घेतल्यास त्याचा चांगला फायदा होतो.



**पाण्याचे प्रमाण अधिक :** काही शेतकऱ्यांकडे बोअरवेलला किंवा शेततळ्याचे पाणी असल्यास त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात उन्हाळाभर हिरवा चारा असतो.

ज्यामुळे शेतकरी नेहमीच आपल्या जनावरांना हिरवा चारा टाकताना दिसून येतात. मात्र, हे पूर्णतः चूकीचे असल्याचे पशुतज्ज्ञांनी म्हटले आहे. पशुतज्ज्ञांच्या माहितीनुसार, हिरव्या चाऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचे प्रमाण आढळते. ज्यामुळे नियमित हिरवा चारा खाल्याने दुधाळ जनावरास पोटफुगी, डायरिया किंवा मग अन्य रोगांचा सामना करावा लागू शकतो.

**दुधाला फॅट न मिळणे :** पशुतज्ज्ञांच्या माहितीनुसार, केवळ हिरव्या चाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या दूध उत्पादनाला देखील फटका बसू शकतो. यामध्ये प्रामुख्याने दुधाच्या गुणवत्तेमध्ये मोठी घट दिसून येते. अर्थात शेतकऱ्यांना दुधाला फॅट मिळणार नाही.

त्यामुळे शेतकऱ्यांना दुधाळ जनावरास एखाद्या कंपनीचे प्रमाणित खनिजे मिश्रण आणि सुखा चारा देखील नियमित दिला पाहिजे. ज्यामुळे दुधाळ जनावरांचे आरोग्य ठीक राहून, दुधाची गुणवत्ता देखील मिळते.

**पोटफुगी झाल्यास करा 'हा' उपाय :** कधी-कधी दुधाळ जनावर हिरवा चारा टाकल्यानंतर अधाश्याप्रमाणे सर्व चारा खात राहते. मात्र, त्यामुळे दुधाळ गायीला किंवा म्हशीला पोटात जंत किंवा पोटफुगी होण्याचा धोका संभवतो.

अशावेळी शेतकऱ्यांनी गायीला अर्धा किलो मोहरी तेलात ५० ग्रॅम तारपीन या वनस्पतीचे तेल पाजावे. याशिवाय काही दिवस संबंधित गायीला किंवा म्हशीला हिरवा चारा उन्हात थोडासा वाळवून खायला द्यावा. ज्यामुळे त्यातील पाण्याचे प्रमाण कमी राहून, पोटफुगी झालेल्या जनावरास आराम पडण्यास मदत होईल. असेही पशुतज्ज्ञांनी म्हटले आहे.

# नैसर्गिक शेतीवर मिळवा ६.६ लाखांचे अनुदान!

सध्या आपली शेती अनेक अडचणींना सामोरी जाते आहे. जमिनीची घटती सुपीकता, उत्पादनात घट, अन्नधान्याची खराब गुणवत्ता आणि रासायनिक शेतीमुळे आरोग्यावर होणारे परिणाम. या सगळ्या गोष्टी लक्षात घेता महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचललं आहे. राज्याने ''डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन'' ही योजना सुरू केली असून, यातून शेतकऱ्यांना रासायनमुक्त शेतीसाठी आर्थिक मदत दिली जाते.

**या योजनेचा हेतू :** या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीकडे वळवणं. शेतकऱ्यांनी रासायनिक खते आणि औषधं न वापरता जैविक पर्यायांचा वापर करावा, जेणेकरून जमिनीची सुपीकता वाढेल, आरोग्यदायी अन्नधान्य तयार होईल आणि पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम टाळले जातील. शेती टिकाऊ व्हावी, उत्पादनात सातत्य राहावं आणि मानवी आरोग्याचं रक्षण व्हावं, हेही या योजनेमागचं उद्दिष्ट आहे.

**योजनेची रचना आणि मदतीचा लाभ :** ही योजना महाराष्ट्रातील सगळ्या ३४ जिल्ह्यांमध्ये राबवली जाते. एका गटात ५० हेक्टर क्षेत्र असतं आणि १० असे गट एकत्र येऊन एक शेतकरी उत्पादक कंपनी तयार होते. सरकार दरवर्षी प्रति हेक्टर १३,२०० रुपये अशी आर्थिक मदत देते. तीन वर्षांच्या कालावधीत एका कंपनीला एकूण ६.६० लाख रुपयांचं अनुदान मिळू शकते.



**अनुदान कुठे वापरता येईल?**

या योजनेतून मिळालेलं अनुदान फक्त शेतीसाठी वापरण्याचे बंधन आहे. त्याचा उपयोग जैविक खते, जीवामृत, दशपर्णी अर्क तयार करण्यासाठी करता येतो. याशिवाय शेतमालाचं प्रमाणीकरण, प्रमाणपत्र मिळवणं, मालाचं पॅकिंग, ब्रँडिंग, विक्री यासाठीही या पैशांचा उपयोग करता येतो. एकूणच नैसर्गिक शेतीचं सगळं व्यवस्थापन या योजनेतून शक्य होते.

**पात्रता आणि काही अटी :** या योजनेसाठी अर्ज करताना काही अटींचे पालन करणे आवश्यक आहे. शेतकऱ्याने जास्तीत जास्त २ हेक्टरपर्यंतचे क्षेत्र दाखवून अर्ज करता येतो. अर्जदाराने रासायनिक खते किंवा बी.टी. बियाण्यांचा वापर केलेला नसावा. अनुसूचित जाती, जमातींना लोकसंख्येनुसार प्राधान्य दिलं जातं आणि महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

**अर्ज कुठे आणि कसा करायचा?** या योजनेसाठी अर्ज प्रक्रिया ऑनलाइन आणि ऑफलाइन दोन्ही प्रकारे उपलब्ध आहे. शेतकऱ्यांनी आपल्या तालुक्याच्या कृषी विभागाच्या कार्यालयात जाऊन सविस्तर माहिती घ्यावी. हवं असल्यास अधिकृत संकेतस्थळावरही सर्व माहिती उपलब्ध आहे.

**शाश्वत शेतीकडे एक पाऊल :** ही योजना केवळ आर्थिक मदतीपुरती मर्यादित नाही. ती शाश्वत, पर्यावरणपूरक शेतीकडे जाण्याचा मार्ग आहे. आरोग्यदायी अन्न, निसर्गाशी सुसंगत शेती आणि आपल्या जमिनीची निगा राखण्यासाठी ही योजना फार उपयोगी ठरू शकते. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी या योजनेचा फायदा घेण्यासाठी पुढाकार घ्यावा. नैसर्गिक शेती केवळ आपल्याच नव्हे, तर पुढच्या पिढ्यांचेही आरोग्य आणि भविष्य घडवते.

# दिन विशेष

## महत्वाच्या घटना

१४९७ : वास्को द गामा युरोपातुन भारताच्या पहिल्या थेट सफरीवर निघाला.
१८५६ : चार्ल्स बर्न याल 'मशिनगन'चे अमेरिकेतील पेटंट मिळाले.
१८८९ : 'द वॉल स्ट्रीट जर्नल' चा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९१० : स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी 'मोरिया' या जहाजातुन फ्रान्समधील मार्सेल्सच्या समुद्रात उडी घेतली.
१९३० : किंग जॉर्ज (पाचवा) यांच्या हस्ते लंडनमधे ' इंडिया हाऊस'चे उद्घाटन
१९४८ : अमेरिकेच्या वायुसेना दलात महिलांची भारती करण्यात आली.
१९५४ : देशाचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी जगातील सर्वात मोठ्या कालव्यावर भाकरा-नांगल जलविद्युत प्रकल्प सुरु केला.
१९५८ : बर्लिन येथील जागतिक चित्रपट महोत्सवात 'दो आँखे बारह हाथ' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा सन्मान मिळाला.
१९९७ : बिंजिंग येथे झालेल्या आशियाई महिला वेटलिफ्टिंग स्पर्धेत ४६ किलो गटात भारताच्या एन. कुंजुरानी देवीने रौप्यपदक पटकावले.
२००५ : जलवायू परिवर्तन मुद्यावर जी-८ देशांनी आपली सहमती दर्शवली.
२००६ : मुख्य निवडणूक आयुक्त असताना केलेल्या कामगिरीबद्दल टी. एन. शेषन यांना 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' जाहीर
२०११ : नवीन चिन्ह असलेली नाणी प्रथमच चलनात आली.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७८९ : ग्रँट डफ मराठ्यांचा इतिहास लिहीणारा ब्रिटिश अधिकारी (मृत्यू: २३ सप्टेंबर १८५८)
१८३१ : कोकाकोला चे निर्माते जॉन पंबरटन यांचा जन्म. (मृत्यू: १६ ऑगस्ट १८८८)
१८३९ : जॉन डेव्हिसन रॉकफेलर रॉकफेलर घराण्यातील पहिला उद्योगपती, स्टँडर्ड ऑईल उद्योगसमूह व अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतील पहिल्या तेल उद्योगाचा संस्थापक (मृत्यू: २३ मे १९३७)
१८८५ : ह्यूगो बॉस चे स्थापक ह्यूगो बॉस यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑगस्ट १९४८)
१९१४ : ज्योति बसू प. बंगालचे मुख्यमंत्री (मृत्यू: १७ जानेवारी २०१०)
१९१६ : गो. नी. दांडेकर साहित्य अकादमी पुरस्कार विजेते मराठी लेखक, इतिहासकार व 'गडसम्राट', 'पवनाकाठचा धोंडी', 'जैत रेजैत' या त्यांच्या कादंबर्यांवर चित्रपट निघाले. (मृत्यू: १ जून १९९८)
१९२२ : अहिल्या रांगणेकर मार्क्सवादी कम्युनिस्ट नेत्या (मृत्यू: १९ एप्रिल २००९)
१९४९ : वाय. एस. राजशेखर रेड्डी आंध्रप्रदेशचे १४ वे मुख्यमंत्री (मृत्यू: २ सप्टेंबर २००९)
१९५८ : प्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री नितू सिंह यांचा जन्मदिन.
१९७२ : सौरव गांगुली भारताचा क्रिकेट कर्णधार

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९८४ : कविवर्य बा. भ. बोरकर ऊर्फ 'बाकीबाब' कवी, कादंबरीकार आणि लघुनिबंधकार (जन्म:३० नोव्हेंबर १९१०)
१९८४ : पद्मश्री विजेते गोमंतकीय कवी 'बाकीबाब' उर्फ बाळकृष्ण भगवंत बोरकर यांचे निधन. (जन्म: ३०नोव्हेंबर १९१० )
१९९४ : किम सुंग (दुसरे) उत्तर कोरियाचे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १५ एप्रिल १९१२)
२००१ : तबला विभूषण उस्ताद बाबासाहेब मिरजकर यांचे कोल्हापूर येथे निधन (जन्म:)
२००३ : ह. श्री. शेणोलीकर संतसाहित्याचे अभ्यासक
२००६ : प्रा. राजा राव तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक व लेखक, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते (१९६४), त्यांना 'न्यूस्टाड्ट' या साहित्यातील आंतरराष्ट्रीय पारितोषिकाने गौरवण्यात आले होते (१९८८). (जन्म: ५ नोव्हेंबर १९०८)
२००७ : भारताचे ८वे पंतप्रधान चंद्रा शेखर यांचे निधन. (जन्म: १ जुलै १९२७)
२००८ : महाराष्ट्र भूषण पुरस्कार लाभणारे डॉ. नारायण विष्णू तथा नानासाहेब धर्माधिकारी यांचे निधन.
२०१३ : भारतीय लेखक सुन्द्री उत्तमचंदानी यांचे निधन. (जन्म: २८ सप्टेंबर १९२४)

# तुरीचे उत्पादन वाढवण्यासाठी 'या' उपायांचा करा अवलंब

तूर हे भारतातील एक महत्त्वाचे कडधान्य पीक आहे. हे पीक सलग किंवा मुख्यत: आंतरपीक म्हणून इतर पिकात घेतले जाते. परंतु अनेकदा या पिकाच्या उत्पादनात घट येते. तूर पिकामध्ये वेळोवेळी काही गोष्टींचा अवलंब केल्यास उत्पादनात वाढ करता येते.



**तूर पिकाच्या ओळींमध्ये खांडण्या :** दोन झाडांतील अंतरानुसार मजुरांद्वारे खांडण्या भरणे आवश्यक आहे. काही ठिकाणी डोबणी २-३ वेळा करून खांडण्या बुजवणे आवश्यक आहे.

**निंदणी :** ट्रॅक्टर किंवा बैलजोडीने पेरणी केलेल्या तूर पिकाची निंदणी वेळीच करणे आवश्यक आहे. सोयाबीनसोबत आंतरपीक असल्यास सोडओळ (पट्टापेर) पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

**शेंडे छाटणे :** पीक २५ ते ३० दिवसांचे असताना शेंडे छाटून घ्यावेत. अलीकडे शेंडे छाटण्याची सुरक्षित अशी छोटी यंत्रे उपलब्ध आहेत. छाटणी केल्यानंतर बुरशीनाशकाची फवारणी करणे आवश्यक आहे.

**पाणी व्यवस्थापन :** शेवरा अवस्थेपूर्वी आणि शेंगांमध्ये दाणे भरताना ओलीत करणे आवश्यक आहे. जमिनीत मुबलक ओल असल्यासच शेंडे छाटणे आवश्यक आहे.

**रोग आणि किडींचे नियंत्रण :** शेवरा अवस्थेच्या सुरुवातीला, फुलोरा अवस्थेच्या सुरुवातीला आणि शेंगांमध्ये दाणे भरताना योग्य कीटकनाशकांचा वापर करणे आवश्यक आहे.

**इतर महत्त्वाच्या गोष्टी :** सलग तूर लागवडीसाठी जोडओळ पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. बीटी कपाशी आणि तूर यांच्यातील आंतरपीक पद्धतीमध्ये दोन्ही पिकांची जोडओळ पद्धतीने पेरणी करणे आवश्यक आहे. योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात खते आणि सूक्ष्मसंजीवके देणे आवश्यक आहे. योग्य वेळी आणि योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून काढणी करणे आवश्यक आहे. या गोष्टींचा अवलंब केल्याने तुम्हाला तुमच्या तूर पिकाचे उत्पादन निश्चितच वाढवता येईल.

# नागरिकांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांचा मुक्काम दौरा

## जलसंवर्धन, ग्रामविकास व विशेष सखोल पुनरीक्षणावर भर

जालना। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी ०६ जुलै रोजी मौजे महाकाळा येथे मुक्काम करून मंगळवारी (दि.७) सकाळी अंबड तालुक्यातील अंतरवाली सराटी गावाला भेट देत ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. यावेळी जलसंवर्धन, ग्रामविकास, विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी तसेच विशेष सखोल पुनरीक्षण अभियानाचा आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. गावभेटी दरम्यान जिल्हाधिकारी मित्तल यांनी ग्रामपंचायत कार्यालयात नागरिक, महिला बचत गटांच्या सदस्य, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या तसेच ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. विविध विषयांवर चर्चा करताना त्यांनी भविष्यात उद्भवू शकणाऱ्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले.

यावेळी त्यांनी पाणी संवर्धनासाठी गावात सप्तसूत्री अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना ग्रामपंचायत व ग्रामस्थांना दिल्या. तसेच भूजल पातळी वाढविण्यासाठी 'जलतारा' ही संकल्पना नागरिकांसमोर मांडून



विहीर पुनर्भरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, वनराई बंधारे उभारणे, बदलत्या हवामानाचा विचार करून परंपरागत पीकपद्धतीत आवश्यक बदल करणे तसेच गावामध्ये 'जलपंचायत' स्थापन करून लोकसहभागातून जलव्यवस्थापन करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.दौऱ्या दरम्यान जिल्हाधिकारी यांनी गावातील अंतर्गत रस्ते, नाल्या, स्वस्त धान्य दुकान, शाळा आणि अंगणवाडी केंद्रांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. विविध ठिकाणी आवश्यक सुधारणा करण्याबाबत ग्रामपंचायत पदाधिकारी व संबंधित विभागाच्या कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. शासकीय सुविधा अधिक परिणामकारकपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी समन्वयाने काम करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. विशेष सखोल पुनरीक्षण अभियानाचाही त्यांनी सविस्तर आढावा घेतला. हे काम निर्धारित कालावधीत गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. यावेळी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) व बीएलओ पर्यवेक्षक यांच्या कामाचा आढावा घेत एका कुटूंबाचा एन्युमरेशन फॉर्म प्रत्यक्ष भरून घेण्याची प्रक्रिया तपासण्यात आली. यामुळे क्षेत्रीय स्तरावरील कामाची गुणवत्ता व अचूकतेची खात्री करण्यात आली. जिल्हाधिकारी मित्तल यांनी मौजे सौंदलगाव खुर्द येथे सुमारे वीस वर्षांपासून बंद असलेला आणि समन्वयातून खुला करण्यात आलेला शेतरस्ता प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहिला. या रस्त्यामुळे शेतकऱ्यांची वाहतूक व शेतीकामे सुलभ झाल्याचे सांगत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले. जिल्हाधिकाऱ्यांच्या या मुक्काम दौऱ्यात जलसंवर्धन, ग्रामविकास, नागरिकांच्या समस्या सोडविणे, निवडणूक प्रक्रियेची तयारी आणि स्थानिक पातळीवरील विकासकामांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यावर विशेष भर देण्यात आला. ग्रामस्थांशी थेट संवाद साधून त्यांच्या सहभागातून गावाचा सर्वांगीण विकास साधण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# शाळेचा कायापालट करण्यासाठी सरसावले ग्रामस्थ

## गावकऱ्यांनी उचलली शाळेच्या विकासाच्या जबाबदारी



अंबड। प्रतिनिधी

तालुक्यातील पाथरवाला खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पालक मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या मेळाव्यात विद्यार्थ्यांची प्रगती, शाळेचे नियोजन आणि विविध सुविधा निर्माण करण्यासाठी गावकऱ्यांनी पुढाकार घेत आपापल्या परीने शाळेच्या विकासाची जबाबदारी उचलून आदर्श निर्माण केला आहे.

शासकीय निधी उपलब्ध नसलेल्या अत्यावश्यक कामांसाठी लोकसहभाग मिळवण्याचा निर्णय पालक व ग्रामस्थांनी घेतला. या निर्णयाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या मेळाव्यात विविध दात्यांनी शाळेच्या भौतिक सुविधांसाठी भरीव मदत जाहीर केली. यामध्ये ज्ञानेश्वर तावरे यांनी नवीन शाळेची घंटा तयार करून देण्याची, तर गोकुळ घाडगे यांनी मोठा फोकस लाईट बसवून देण्याची जबाबदारी घेतली. शाळेच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी श्याम भैया हर्षे, आसाराम हर्षे, प्रल्हाद घाडगे, भोलेनाथ सुडके, मेहरनाथ हर्षे, ज्ञानेश्वर तावरे, प्रवीण हर्षे, सुरेश पाचुंदे, अमोल चव्हाण, कल्याण सुडके, राजेंद्र राऊत (पोलीस पाटील) आणि लक्ष्मण हर्षे यांनी प्रत्येकी १,००० रुपयांचे आर्थिक सहकार्य केले. यासोबतच रमेश नाना ढवळे यांनी खुर्ची खरेदीसाठी १,००० रुपये देण्याचे जाहीर केले.

शाळेच्या शिक्षकांनी स्वतःच्या पुढाकारातून सुमारे ३५,००० रुपये किमतीचा संगणक आणि प्रिंटर संच खरेदी केला असून, उपस्थित ग्रामस्थांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास हर्षे होते, त्यांनी शाळेसाठी ३,००१ रुपयांची मदत घोषित केली. तसेच उपाध्यक्ष सुभाष बेहडे व युवा उद्योजक किरण हर्षे यांनी ३,००० रुपयांचे आश्वासन देऊन सहकार्याचा शब्द दिला.

# तहसीलदाराने लक्ष न दिल्यामुळे उपोषण करण्याची वेळ

जालना। प्रतिनिधी

१५ते२० वीस दिवसापूर्वी अंबड तहसीलदार यांना चौकशी करण्यासंदर्भात मूक व आंधळं ? तलाठी ग्रामसेवक या दोघांची चौकशी करण्यासंदर्भात कारवाई करण्यासाठी पत्र तहसील कार्यालय व गट विकास अधिकारी यांना पत्र देण्यात आले होते परंतु या संदर्भात तहसीलदार येणे काहीच कारवाई नाही केल्यामुळे उपोषण करण्याची वेळ उपोषणकर्ते यांच्यावर आली.





घर नावावर करीत नसल्यामुळे ग्रामसेवक व तलाठी यांच्या विरोधात अंबड तहसील कार्यालय समोर आज पासून उपोषण सुरू करण्यात आले आहे. असे निवेदन तहसीलदार व गटविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक, यांना देण्यात आले आहे. कर्जत येथील निवासी घर नेमाप्रमाणे नावावर ग्रामसेवक करीत नसल्यामुळे उपोषण करण्यात येणार असे निवेदन देण्यात आले होते. २५- मार्च- २०२६ नुसार शासन निर्णय नुसार समीतीला विश्वासात न घेता परस्पर आठ अ उतारे जागेचे दिल्यामुळे याप्रकरणी चौकशी करण्यात यावी. तसेच मौजे कर्जत येथील डॉ. आण्णाभाऊ साठे यांचे पुतळया जवळ झालेले अतिक्रण तात्काळ काढण्यात यावी.

सुनिल काळुके यांचे सरकारी गायरान जमिनीत गट नं. २४६ मध्ये निवासी घरासाठी सन १९९८ पासून रहात असून मी त्या जागेचा आजरोजी उपभोग घेत आहे. सदरील शासन निर्णयानुसार माझे गायरान जमीनीतील निवासी घर नियमाकुल करण्यात यावे सदर जागेत शासनाने दिलेले घरकुल बांधकाम केलेले आहे नळपट्टी टॅक्स पावती इ. मी नियमानुसार भरत आहे. तरी सदर गायराणातील घर निवासी जागा माझे नावे करण्यात यावी. तसेच मौजे कर्जत येथील गट नं. २४६ गायरान जमीनीमध्ये काही लोकांना संबधीत ग्रामसेवक तसेच तलाठी यांनी संगणमत करुन काही लोकांना आठ अ उतारे जागेचे दिले आहेत त्यांनी कोणत्याही स समीतीला विश्वासात न घेता आर्थिक व्यवहार करुन बेकायदेशीर जागेचे आठ अ उतारे दिले आहे. या बाबत तात्काळ चौकशी करुन संबधीत अधिकारी व कर्मचारी यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावे. तसेच मौजे कर्जत येते अण्णाभाऊ साठे यांचे पुतळ्याच्या बाजुने गावातील काही लोकांनी पुतळ्याच्या बाजूने अंगणवाडी भाग क्र. २पासून पुतळ्यास पर्यंतचे काही लोकांनी पत्राचे शेड मारुन अतिक्रण केले आहे. त्यामुळे आण्णाभाऊ साठे यांचा पुतळा झाकल्या जात आहे. याची तात्काळ पहानी करुन पंचनामा करुन पुतळ्या समोरील अतिक्रमण तात्काळ हटविण्यात यावे अशी मागणी करण्यात आली नसता अंबड तहसील कार्यालया समोर आज ६ जुलै सोमवार पासून सकाळी अमरण उपोषणास सुरू केले आहे. यावेळी काही अनुचित घटना घडल्यास व माझे जिवीतास काही झाल्यास यांची संपुर्ण जबाबदारी तलाठी व ग्रामसेवक यांची वर राहील असे निवेदन म्हटले आहे.

# १० जुलैपर्यंत गणना प्रपत्रांचे वितरण, संकलन व डिजिटायझेशन पूर्ण करा–रामदास दौंड

जालना । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या २०२६ कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आशिमा मित्तल व उप जिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे आयोजित जालना शहरातील सर्व मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांच्या आढावा बैठकीत मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रामदास दौड यांनी बैठकीत १० जुलैपर्यंत गणना प्रपत्रांचे वितरण, संकलन व डिजिटायझेशन पूर्ण करण्याचे निर्देश दिले.



बैठकीस प्रभारी तहसीलदार श्रीमती प्रणाली तायडे, शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती संगिता भागवत, माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब खरात तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी, नायब तहसीलदार निवडणूक विष्णू घुगे,सतिष पडघन, केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी दि. १० जुलै २०२६ पर्यंत गणना प्रपत्रांचे वितरण, संकलन व डिजिटायझेशन ही कामे वेळेत आणि अचूकपणे पूर्ण करावीत, असे निर्देश उपविभागीय अधिकारी जालना रामदास दौंड यांनी दिले. कोणताही पात्र मतदार या प्रक्रियेपासून वंचित राहणार नाही याची विशेष काळजी घेण्यासह प्रत्येक घरापर्यंत पोहोचून प्रपत्रांचे वितरण व संकलन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन च्या माध्यमातून उपविभागीय अधिकारी जालना रामदास दौंड यांनी -२०२६ मोहिमेचे उद्दिष्ट, गणना प्रपत्र भरण्याची पद्धत, माहिती पडताळणी, डिजिटायझेशन प्रक्रिया, कामकाजाचे वेळापत्रक तसेच भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांची सविस्तर माहिती दिली. प्रपत्रांमधील माहिती अचूक व त्रुटीरहित राहील यासाठी प्रत्येक टप्प्यावर दक्षता घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. बैठकीत महसूल, शिक्षण व पोलिस प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात आला. -२०२६ मोहिमेची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधित अधिकारी, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि यांनी नियोजनबद्ध व जबाबदारीने काम करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. बैठकीच्या शेवटी उपस्थितांच्या शंकांचे निरसन करण्यात आले तसेच भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या वेळापत्रकानुसार सर्व कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# संत मुक्ताबाई दिंडीचे तहसीलदारकडून अंबडमध्ये स्वागत

अंबड। प्रतिनिधी

मंगळवार रोजी श्री मत्स्योदरी देवी संस्थान परिसरात श्री संत मुक्ताई दिंडीचे संस्थान अध्यक्ष तथा तहसीलदार श्री सोमेश मोहिते यांनी स्वागत करून व त्यांच्या हस्ते श्री संत मुक्ताईस अभिषेक आरती करण्यात आली. मुक्ताई दिंडीस संस्थान तर्फे नाष्टा व गिल्डा परिवार अंबड यांच्या तर्फे चहा देण्यात आला. नाष्टा व चहा वाटप व्यवस्था आर्ट ऑफ लिव्हिंग अंबड व देवीचे भक्त यांनी केली. यावेळी संस्थान विश्वस्त पुजारी गीतविलास खुंटेफळकर, संस्थान व्यवस्थापक श्री कैलास शिंदे, संस्थान कर्मचारी श्री नामदेव राठोड, गोविंद कायस्थ ,अर्जुन शिंदे,दिगंबर खरात , महेश खरात, शुभम भवर व गिल्डा परिवार उपस्थित होते.



जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १५२/२०२५**

**प्रदिप सुदर्शन गिते**

**ग्रामपंचायत कार्यालय सानपवाडी**

पहा

१.प्रदिप सुदर्शन गिते रा. सानपवाडी ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत सुदर्शन मनोहर गिते यांचा दिनांक ०२/०१/२००६ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहू येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस सानपवाडी ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे सानपवाडी ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक ०१/०७/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०१/०८/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

# पृथ्वीचे सौंदर्य सिमेंटच्या जंगलात नव्हे तर वनाच्या जगलात दडलेले आहे:प्रा.डॉ. सानप

## वन महोत्सव निमित्त शासकीय ग्रंथालय कार्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न.

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

पृथ्वीचे सौंदर्य सिमेंटच्या जंगलात नव्हे तर वनांच्या जंगलात दडलेले आहे हे ओळखून प्रत्येक व्यक्तीने वन संपत्तीची जोपासना करण्याची आवश्यकता आहे. असे मत प्राचार्य डॉ. नामदेव सानप यांनी व्यक्त केले. छत्रपती संभाजी नगर येथील शासकीय ग्रंथालय, सावित्रीमाई महिला महाविद्यालय आणि मॉडर्न महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वन महोत्सव निमित्त ग्रंथालय परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. नामदेव सानप हे बोलत होते. या




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे हे होते तर व्यासपीठावर शासकीय ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. नामदेव सानप म्हणाले की, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वनसंपत्तीची आवश्यकता आहे. रातोरात सिमेंटच्या इमारती उभा करता येऊ शकतात परंतु रातोरात वृक्ष संपत्ती उभा करता येत नाही. त्यामुळे वृक्षांचे संगोपन व संरक्षण करण्यासाठी व पृथ्वीचे सौंदर्य जपण्यासाठी नागरिकांनी आपले योगदान देण्याची गरज आहे .असे मत व्यक्त केले. यावेळी सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे म्हणाले की, निसर्गाचा समतोल राखण्यासाठी पर्यावरणाचा समतोल राखणं अत्यंत आवश्यक आहे. यासाठी वनसंपत्तीमध्ये वाढ होण्याची गरज आहे. नागरिकांनी वनसंपत्तीचे महत्त्व लक्षात घेऊन आपले योगदान द्यायला हवे. शासकीय ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव म्हणाले की, मानवी जीवनात निरोगी व समृद्ध आरोग्याची अत्यंत आवश्यकता असते आणि ते प्राप्त करण्यासाठी निसर्गाचा समतोल आवश्यक असतो आणि निसर्गाचा समतोल टिकून ठेवण्यासाठी वनसंपत्तीची आवश्यकता असते हे ओळखून वनांचं संरक्षण व जोपासना करण्याची आवश्यकता आहे असे म्हटले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते ग्रंथालय परिसरात विविध फळझाडांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा.ज्योती मोरे यांनी केले तर शेवटी गोविंद खेडकर यांनी आभार मानले यावेळी प्रा. हर्षद वाघमारे, प्रा.डॉ. अस्मिता साळवे, प्रा.डॉ. प्रज्ञा किवंडे, प्रा. उत्कर्षा इंगोले, प्रा. तुबा सय्यद, महाविद्यालय व्यवस्थापन प्रमुख संतोष प्रधान, पवन मस्के दिगंबर जाधव यांचे सह ग्रंथालय कार्यालयातील कर्मचारी व महाविद्यालय विद्यार्थी उपस्थित होते.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

बुधवार दि.०८ जुलै २०२६ | ६

# गावच्या सरपंचांनी वृक्षारोपणासाठी मागणी केल्यास रोपे उपलब्ध करुन द्यावीत -जिल्हाधिकारी जॉन्सन

## राज्यव्यापी ३०० कोटी वृक्ष लागवड अभियान बैठक संपन्न ;जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे यंत्रणांना नियोजनबद्ध कारवाईचे आदेश

बीड । प्रतिनिधी

राज्यात वर्ष २०२६ च्या पावसाळ्यात ३०० कोटी वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातही वृक्ष लागवड अभियान प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित यंत्रणांनी दिलेल्या उद्दीष्टाप्रमाणे योग्य नियोजन व कार्यवाही करावी, तसेच ग्रामीण भागात पर्यावरण रक्षणासाठी लोकसहभाग वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. तरी एखाद्या गावचा सरपंच गावात झाडे लावण्यास इच्छुक असेल आणि त्यांनी प्रशासनाकडे मागणी केली, तर त्यांना कोणतीही दिरंगाई न करता थेट रोपे उपलब्ध करून द्यावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित वृक्ष लागवड अभियानाबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक मयंक गांधी, वन परिक्षेत्र अधिकारी ए.डी. मुंडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे आणि उपवन संरक्षक उमेश बिराजदार प्रत्यक्ष तर बीड व अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.



जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले, पावसाळ्यात ३०० कोटी वृक्षारोपण या अभियानांतर्गत ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात जवळपास ३० लाख वृक्षांची लागवड केली जाणार आहे. वृक्ष लागवडीमध्ये केवळ झाडे लावणे नव्हे, तर त्यांचे संगोपन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ही बाब लक्षात घेऊन ग्लोबल विकास ट्रस्ट या झाडांच्या संगोपनाचीही जबाबदारी घेणार असल्याचेही पान ३ वर

### वृक्ष लागवड करण्यासाठी यंत्रणानिहाय उद्दीष्टांचे वाटप

जिल्हाभरात वन विभाग आणि सामाजिक वनीकरण विभाग यांच्याकडे लागवडी योग्य एकुण २९.५० लक्ष रोपे उपलब्ध आहेत. यामध्ये उद्दीष्टानूसार वाटपात सामाजिक वनीकरण विभाग १४ लाख, वन विभाग प्रादेशिक ६ लाख ५० हजार, वन्य जीव विभाग १ लाख ८ हजार, महसूल विभाग ५० हजार, पोलिस व इकोबटालियन विभाग ५० हजार, ग्रामविकास विभाग २ लाख ४१ हजार, नगरपरिषद व नगर पंचायत विभाग ५० हजार, जिल्हा परिषद शिक्षण विभाग १ लाख तर अशासकीय संस्था ३ लाख आणि कृषी विभागास पांडूरंग फुंडकर राज्य योजनेतून ५ लाख व जिल्हा रेशीम विभागाला राज्य योजनेतून ३१ लक्ष या प्रमाणे शासनाने दिलेल्या सुचनेप्रमाणे उद्दीष्ट वाटप करण्यात आले आहे.

# जुगार अड्ड्यावर छापा, ६ जणांना अटक; ४.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई पोलीस ठाण्याच्या पथकाने अवैध धंद्यांविरुद्ध मोठी कारवाई करत देवपिंप्री शिवारातील एका जुगार अड्ड्यावर छापा टाकला आहे. या कारवाईत ६ जणांना जुगार खेळताना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांच्याकडून ४ लाख २५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी दिले होते। या आदेशानुसार, गेवराई पोलिसांनी विशेष पथक तयार करून दि. ०६ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजण्याच्या सुमारास अंतरवलीकडे जाणाऱ्या पांदन रस्त्यालगत, देवपिंप्री शिवारातील गायरान जमिनीतील एका गोठ्यावर अचानक छापा टाकला। यावेळी पान ३ वर

# भगवान विद्यालयाचा राज मुंडे बॅडमिंटन स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम

बीड । प्रतिनिधी

जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन यांच्या वतीने जिल्हास्तरावर घेण्यात आलेल्या बॅडमिंटनच्या वेगवेगळ्या गटातील स्पर्धेत भगवान विद्यालयाचा विद्यार्थी ची राज दादासाहेब मुंडे हा दोन गटात प्रथम तर एका गटात उपविजेता ठरला आहे त्याच्या या यशाबद्दल त्याचे शाळेच्या वतीने व मित्र परिवाराने अभिनंदन केले आहे.... बीड जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन दरवर्षी बीड जिल्ह्यातल्या सर्व बॅडमिंटन खेळाडू साठी नऊ ते १९ वयोगटातील व खुल्या गटासाठी स्वतंत्रपणे स्पर्धा आयोजित करीत असतात यावर्षी या



स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यातल्या सर्व बॅडमिंटन खेळाडूंनी सहभाग नोंदवलेल्या व अत्यंत चुरशीच्या झालेल्या स्पर्धेमध्ये वेगवेगळ्या खेळाडूंनी आपले कौशल्य दाखवले आहे भगवान विद्यालयाचा विद्यार्थी तथा अजिंक्य इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली बॅडमिंटनची तयारी करत असलेला व ठाणे येथील अकॅडमी मध्ये बॅडमिंटनचे प्रशिक्षण घेत असलेला खेळाडू राज दादासाहेब मुंडे हा भगवान विद्यालयाचा विद्यार्थी आहे त्यांनी यावर्षी झालेल्या सतरा व १९ या दोन्ही वयोगटात तर खुल्या दुहेरी गटात अजिंक्यपद मिळवले आहे त्याने स्वतंत्र सतरा वर्ष मुलांच्या गटात प्रथम तर स्वतःच्याच प्रशिक्षिका सोबत दुहेरीच्या खुल्या गटात प्रथम क्रमांक मिळवला आहे त्याचबरोबर स्वतः सतराव्या वर्षाच्या गटात असून १९ वर्षाखालील मुलांच्या गटात तो अंतिम फेरीत गेला होता परंतु तिन्ही सामने सलग आल्याने त्याने दोनच सामने खेळण्याचा निर्णय घेतला त्यामुळे १९ वर्षाखालील गटात त्याला उपविजेते पद मिळाले त्याने स्वतःहूनच समोरच्या खेळाडूला बाय दिल्यामुळे त्याची संधी हूकलेली आहे अत्यंत शिस्तबद्ध खेळणाऱ्या भगवान विद्यालयाच्या राज दादासाहेब मुंडे या खेळाडूच्या या यशाबद्दल भगवान विद्यालयाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते गो गो मिसाळ सचिव डॉक्टर अनिल सानप भगवान विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक त्याचे वर्गशिक्षक वडमारे सर त्याचे क्रीडाशिक्षक भोसले सर व सर्वच शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

# मुक्ताबाईंचा पालखी सोहळा आज गेवराई शहरात मुक्कामाला

## नगराध्यक्ष गीताभाभी पवार करणार स्वागत

गेवराई । प्रतिनिधी

मुक्ताईनगर येथुन पंढरपुरकडे निघालेल्या संत मुक्ताबाई पालखीचे बुधवार ता. ७ रोजी सायंकाळी सहा वाजता गेवराई शहरात आगमन होणार असून गेवराई च्या नगराध्यक्षा गीताभाभी बाळराजे पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पालखीचे स्वागत करण्यात येणार आहे.

मुक्ताईची पालखी चिंतेश्वर



महादेव मंदिरात मुक्कामाला थांबणार आहे. शहरातील भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन नगराध्यक्षा सौ. पवार यांनी केले आहे. मुक्ताईनगर येथील संत मुक्ताबाईंची पालखी मंगळवार रोजी वडीगोद्री येथे मुक्कामी थांबुन बुधवारी पहाटे शहागड मार्गे शहरात येणार आहे. शहरातील डॉ. गणेश फलके यांच्या रुग्णालया जवळ पालखीचे स्वागत गेवराई च्या नगराध्यक्ष पान ३ वर

# जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांची कृषीकुलला भेट



बीड । प्रतिनिधी

जालना जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांनी नुकतीच कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्राला भेट देऊन संस्थेच्या विविध उपक्रमांची पाहणी केली. मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रशासन आणि यांच्या संयुक्त प्रयत्नांतून रेशीम उद्योगाला नवी दिशा मिळणार असून, जालना जिल्ह्यातील पान ३ वर

# गायक राज रायते यांना प्रथम तेली समाज युवा गायक पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी

श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्यावर आधारित असलेले राज रायते यांचे अनेक सुप्रसिद्ध गीत आज महाराष्ट्रभर नव्हे तर भारतात पोहोचत आहे. आपल्या सुमधुर आवाजानी समस्त तेली समाज बांधवांचे व अनेक प्रेक्षकांचे आपल्या गायनाने मन जिंकणारा राज रायते यांना आतापर्यंत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भरपूर ठिकाणी मोठ्या प्रमाणात सत्कार पार पडली आहे व पडत



आहे. अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमही राज यांचे होत आहे आतापर्यंत राज रायते यांना तेली सेना संस्थापक अध्यक्ष गणेश पवार यांच्या वतीने तेली समाज भूषण पुरस्कार, जय संताजी बहुउद्देशीय संस्था जामनेर जळगाव संस्थापक अध्यक्ष अजय जी चौधरी साहेब यांच्या वतीने तेली समाज रत्न पुरस्कार आणि नुकताच संताजी नवयुवक मंडळ ,महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष सुभाष कमल घाटे साहेब यांच्या वतीने प्रथम तेली समाज युवा गायक पुरस्कार हे मानाचे पुरस्कार जाहीर झाले आहेत. पान ३ वर

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सभागृहात आवाज उठवा, अन्यथा राजीनामा द्या! -लिंबागणेश येथे बॅनरबाजी

लिंबागणेश । प्रतिनिधी

राज्यात सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमाफी, २०२५ चार पिकविमा, घोषित थकीत अनुदान,विविध प्रलंबित प्रश्नांवर लोकप्रतिनिधींनी सभागृहात प्रभावीपणे आवाज उठवावा, अन्यथा राजीनामा द्यावा, अशी मागणी करणारी बॅनरबाजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे करण्यात आली.

अखिल भारतीय किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉ.अजय बुरांडे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत लिंबागणेश येथील मुख्य प्रवेशद्वारावर तसेच प्रमुख चौकांमध्ये बॅनर



लावण्यात आले आहेत.या बॅनरवर ‘‘सरसकट कर्जमाफी, २०२५ चा पिकविमा, घोषित शेतकरी अनुदान व इतर शेती प्रश्नांवर सभागृहात प्रश्न मांडणार नसाल तर राजीनामा द्या‘‘ असा मजकूर प्रसिद्ध करण्यात आला.

यावेळी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी सांगितले की, २०२५ चा पिकविमा, सरसकट कर्जमुक्ती, घोषित शेतकरी अनुदान तसेच इतर शेतीविषयक प्रलंबित प्रश्नांवर बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी विधानसभेत व विधान परिषदेत ठोस भूमिका घेत शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी प्रभावी आवाज उठवणे आवश्यक आहे. अन्यथा शेतकऱ्यांचा विश्वास गमावलेल्या लोकप्रतिनिधींनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा.

या आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ आप्पा गिरे, सेवा सोसायटी चेअरमन रविबापु निर्मळ, माजी सरपंच शंकर वाणी,बाळकृष्ण थोरात,विक्की वाणी, सय्यद अख्तर, महावीर वाणी, अक्षय आबदार , दादा गायकवाड, भगवान मोरे, तुळशीराम वनवे, गणपत तागड,रत्नाकर वाणी, रामदास मुळे, संतोष भोसले, संभाजी वाणी, तानाजी वाणी, बबन तागड, रामदास वाणी, माऊली कुदळे, नामदेव आवसरे, सिताराम थोरात आदी सहभागी झाले होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत लोकप्रतिनिधींनी तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# मयत तरुण शेतकऱ्याच्या कुटुंबियांला २० लाखाची मदत द्या व महावितरणावर गुन्हा दाखल करा !

वडवणी । प्रतिनिधी

महावितरणाच्या विज तारेला स्पर्श होऊन २६ वर्षीय तरूण शेतकऱ्याचे दुर्दैवी निधन झाले आहे. या घटनेमध्ये संबंधित महावितरणा विभाग दोषी असून त्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा तात्काळ दाखल करावा तसेच मयताच्या कुटुंबियांना २० लाखाची मदत जाहिर करावी अशी मागणी ठाकरेसेनेचे वडवणी शहराध्यक्ष भैय्या खोसे यांनी केली आहे. याबाबत वडवणी तहसीलदार यांना निवेदन दिले आहे.

दि.५ जुलै २०२६ वार-रविवार रोजी वडवणी तालुक्यातील मौजे चिंचोटी येथील युवा शेतकरी माऊली दिलीप गोंडे (वय २६



वर्ष) हे पिंपरखेड शिवारातील शेतामध्ये हरणांनी केलेल्या नास्दुष्ट पिकांची पाहणीसाठी गेले असता शेतातून विजेची तार गेल्याने त्या तारेला स्पर्श होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेला तीन दिवस होऊन उलटले आहेत.तरी देखील पान ३ वर

# शाळकरी मुलींची छेडछाड; 'रोड रोमिओं'चा बंदोबस्त करण्याची पालकांची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील साठे चौक (खर्डा रोड) परिसरात शाळकरी मुलींची छेडछाड होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या त्रासाला कंटाळून नफरवाडी, पारगाव घुमरा आणि येवलवाडी येथील विद्यार्थी व पालकांनी एकत्रित येत पाटोदा पोलीस ठाण्याच्या निरीक्षकांना निवेदन दिले असून, परिसरात तात्काळ पोलीस गस्त वाढवून मुलींना सुरक्षा प्रदान करण्याची मागणी केली आहे.

नफरवाडी, पारगाव घुमरा व परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दररोज पाटोदा येथे यावे लागते. साठे चौक येथे मुलींना वेळेवर बस उपलब्ध होत नसल्यामुळे, त्यांना तेथे तासनतास ताटकळत उभे राहावे लागते. याच वेळेचा फायदा घेऊन काही टवाळखोर आणि 'रोड रोमिओ' दुचाकीवरून या परिसरात चकरा मारतात. हे टवाळखोर मुलींच्या अवतीभवती दुचाकीवरून धोकादायक पद्धतीने कट मारून फिरतात, तसेच मुलींसमोरच आपापसात अर्वाच्छ व अश्लील भाषेत शिवीगाळ करतात, असे विद्यार्थ्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

पोलीस प्रशासनाकडे पालकांच्या मागण्या:

या गंभीर परिस्थितीची दखल घेत पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी पोलिसांकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत:

विशेष पोलीस गस्त: शाळा भरण्याच्या (सकाळी ८:३० ते १०:००) आणि सुटण्याच्या (दुपारी ३:३० ते ४:३०) वेळेत साठे चौकात विशेष पोलीस गस्त तैनात करण्यात यावी. हेल्पलाईन सुविधा: मुलींना आणीबाणीच्या प्रसंगी तात्काळ मदत मिळण्यासाठी पोलिसांचा हेल्पलाईन नंबर उपलब्ध करून देण्यात यावा. शाळकरी मुलींची सुरक्षा लक्षात घेता, पोलीस प्रशासन यावर काय कारवाई करते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# काँग्रेस कमिटी अंबाजोगाई तालुकाध्यक्षपदी अभिजीत लोमटे यांची फेरनिवड



बर्दापूर । प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीचा भाग म्हणून अंबाजोगाई तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी अभिजीत लोमटे यांची पुन्हा एकदा निवड करण्यात आली आहे.

संघटन सृजन अभियानांतर्गत प्रत्येक तालुक्यात काँग्रेस कमिटीच्या वतीने थेट तालुक्यातील कार्यकर्त्यांशी संवाद साधण्यात आला होता. त्या अनुषंगाने पक्षश्रेष्ठींनी कार्यकर्त्यांचे मत जाणून घेत तालुकाध्यक्षांची निवड केली. कार्यकर्त्यांच्या एकमताने अभिजीत लोमटे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले असून महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे प्रदेश पान ३ वर

# प्रणिता गंगाखेडकर यांनी बीडच्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला

बीड । प्रतिनिधी

बीड पंचायत समितीच्या प्रभारी गटशिकणाधिकारीपती जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प्रणिता गंगाखेडकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी दिनांक ६ जुलै २०२५ रोजी सदर नियुक्तीचे आदेश निर्गमित केले.

बीड पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी पदी सेवा जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती प्रणिता गंगाखेडकर यांची नियुक्ती झाल्याने त्यांनी सोमवारी आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. बीड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी तथा प्रभारी शिक्षणाधिकारी भगवान



सोनवणे यांची दि. ३० जून रोजी सेवानिवृत्ती झाल्याने सदर पद रिक्त झाले होते. श्रीमती प्रणिता गंगाखेडकर यांनी शिक्षक म्हणून उल्लेखनीय काम केले त्यानंतर त्यांची ज्येष्ठ शिक्षणाविस्तार अधिकारी या पदावर नियुक्ती झाली गुणवत्ता वाढीसाठी केंद्रात आणि तालुकास्तरावर त्यांनी मोठे योगदान दिले आहेत. समग्र शिक्षा चे बीड पंचायत समितीचे गटसमन्वयक म्हणूनही त्यांनी मोठे योगदान दिले आहे. कार्यतत्पर, अभ्यासू आणि प्रामाणिक म्हणून त्या सुपरिचित आहेत. का रे भर स्वीकारल्यानंतर अनेक शिक्षक संघटना संस्था आणि व्यक्तिगत त्यांचा गौरव करण्यात आला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk